❖ संस्थापक : कै. वसंत काणे ❖ नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ ❖ पुणे आवृत्ती | गुरुवार, दि. २४ सप्टेंबर २०२६ | ❖ पाने : ८ ❖ अंक : २७० ❖ Gmail : news.sandhya@gmail.com ❖ किंमत : ७ रूपये

www.dainikesandhya.com Epaper - www.sandhyaepaper.com www.youtube.com/@sandhyalivenews

७० वर्ष
निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक
# संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

क्युआर स्कॅन करून
दै. संध्याच्या
यूट्युब चॅनलला सबस्क्राईब करा
SUBSCRIBE
www.sandhyaepaper.com

# दुष्काळाशी लढताना निधी कमी पडू देणार नाही : मुख्यमंत्री

## परिस्थिती गंभीर असली तरी शेतकऱ्यांनी खचून जाऊ नये : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## पिण्याच्या पाण्याला सर्वोच्च प्राधान्य

## सरसकट मदत, पीक विमा, चारा आणि अन्नधान्यासाठी उपाययोजना

## करजखेड्यात साठवण तलावासह नुकसानग्रस्त पिकांची बांधावर जाऊन पाहणी

**ना पाऊस, ना पाणी : दुष्काळी परिस्थितीमुळं लग्न जमेना, तरुण शेतकऱ्यानं मुख्यमंत्री फडणवीसांसमोर मांडली व्यथा**



■ धाराशिव (दै. संध्या)

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तुळजापूर तालुक्यातील करजखेडा येथे थेट शेताच्या बांधावर जाऊन शेतकऱ्यांच्या व्यथा जाणून घेतल्या. कोरडा पडलेला साठवण तलाव आणि नुकसानग्रस्त पिकांची अवस्था पाहिल्यानंतर परिस्थिती गंभीर असली तरी शेतकऱ्यांनी खचून जाऊ नये. दुष्काळाचा सामना करण्यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना केल्या जातील. कुठेही निधीची कमतरता पडू दिली जाणार नाही. राज्य सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी भक्कमपणे उभे आहे, अशी ग्वाही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिली.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी शेतकरी बळी भोसले यांच्या शेताच्या बांधावर जाऊन नुकसानग्रस्त ऊस आणि सोयाबीन पिकांची बारकाईने पाहणी केली. पेरणी कधी केली, पिकाला किती पाऊस मिळाला, पावसाचा खंड किती काळ राहिला आणि त्याचा पिकाच्या वाढीवर व संभाव्य उत्पादनावर काय परिणाम झाला, याची माहिती त्यांनी शेतकऱ्यांकडून घेतली. सोयाबीनचे पीक पूर्णपणे हातचे गेले असून उसाची वाढही खुंटल्याचे त्यांनी नमूद केले. पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाल्याचे प्रत्यक्ष पाहणीतून दिसत असल्याचे सांगत शेतकऱ्यांना शासनाकडून सरसकट मदत केली जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले. मुख्यमंत्री थेट बांधावर आल्याने परिसरातील शेतकरीही त्यांच्याशी संवाद साधण्यासाठी पुढे आले. पावसाच्या खंडामुळे झालेले नुकसान, उत्पादनातील संभाव्य घट, हंगामासाठी केलेली गुंतवणूक आणि त्याचा कुटुंबाच्या अर्थकारणावर होणारा परिणाम त्यांनी मुख्यमंत्र्यांसमोर मांडला. पावसाकडे डोळे लावून बसलेल्या शेतकऱ्यांच्या भावना मुख्यमंत्र्यांनी ऐकून घेतल्या. मुलांचे शिक्षण बंद पडणार नाही आणि अडचणीच्या काळात शेतकरी कुटुंबांना आवश्यक आधार देण्याचा शासनाचा प्रयत्न राहील, अशी ग्वाही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी दिली. दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर आता उपलब्ध पाण्याच्या प्रत्येक थेंबाचे काटेकोर नियोजन करावे लागणार असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले. सध्याच्या परिस्थितीत पिके वाचविणे कठीण झाले आहे. त्यामुळे उपलब्ध पाणी सर्वप्रथम पिण्यासाठी राखून ठेवावे लागेल. पिण्याच्या पाण्याची गरज भागविल्यानंतर पाणी उपलब्ध राहिल्यास त्याचा अन्य कारणांसाठी वापर करता येईल, असे त्यांनी सांगितले.

पुढील चार ते पाच महिने कठीण असून या काळातून सर्वांना एकमेकांना धीर देत आणि सहकार्य करत मार्ग काढावा लागेल, असेही त्यांनी नमूद केले. शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी शासन सर्व आघाड्यांवर पावले उचलत असल्याचे सांगून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, पीक कर्जमाफीचे काम सुरू आहे. पीक कापणीचे प्रयोगही सुरू असून पीक विम्याची मदत दिली जाईल. पिण्याच्या पाण्यासोबतच जनावरांसाठी चाऱ्याची व्यवस्था करण्यात येईल. रब्बी हंगामासाठी पाण्याची उपलब्धता असल्यास त्यादृष्टीनेही तयारी केली जाईल. दुष्काळाचा सामना करण्यासाठी आवश्यक असलेल्या सर्व उपाययोजना राबविताना निधीची कमतरता पडू दिली जाणार नाही. असे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी कर्जमाफी आणि वीजबिल माफीचा निर्णय घेण्यात आला असून आता थेट आर्थिक मदतही शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. शेतीचे उत्पन्न हातचे गेल्यामुळे शेतकरी कुटुंबांना अन्नधान्याची कमतरता भासणार नाही, यासाठीही आवश्यक उपाययोजना करण्यात येतील. पीक नुकसान, पिण्याचे पाणी, जनावरांचा चारा, पीक विमा, आर्थिक मदत आणि अन्नधान्य अशा सर्व पातळ्यांवर शासन नियोजन करीत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

करजखेड्यातील पाहणीदरम्यान शेतकऱ्यांशी मुख्यमंत्री फडणवीस यांनी थेट संवाद साधला. संकट मोठे आहे मात्र आपण सर्वजण एकमेकांना धीर देऊन आणि एकजुटीने त्यातून मार्ग काढू. शेतकऱ्यांच्या पाठीशी सरकार भक्कमपणे उभे राहील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

या पाहणी दौऱ्यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत पालकमंत्री प्रताप सरनाईक, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले, खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर, जिल्हा परिषद अध्यक्ष अर्चना पाटील, आमदार बसवराज पाटील, राणाजगजितसिंह पाटील व अभिमन्यू पवार, माजी आमदार ज्ञानराज चौगुले, जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी प्रियंवदा म्हाडदळकर, पोलीस अधीक्षक रितू खोखर, उपविभागीय अधिकारी ओंकार देशमुख यांच्यासह संबंधित विभागांचे अधिकारी आणि परिसरातील शेतकरी उपस्थित होते.

# ममता बॅनर्जी यांना मोठा धक्का



■ मुंबई (दै. संध्या)

पश्चिम बंगालच्या विधानसभा निवडणुकीमध्ये तृणमूल काँग्रेसला पराभवाचा मोठा झटका बसला होता. पश्चिम बंगालमध्ये भाजपचा मोठा विजय झाला. दरम्यान या निवडणुकीनंतर तृणमूल काँग्रेसमध्ये मोठी फूट पडल्याचं पहायला मिळालं. आधी 58 आमदारांचा एक गट तृणमूल काँग्रेसमधून बाहेर पडला. या गटाला विधानसभा अध्यक्षांकडून स्वतंत्र गट म्हणून मान्यता देखील देण्यात आली. त्यानंतर आमदारापाठोपाठ वीस खासदारांच्या गटाने देखील ममता बॅनर्जी यांची साथ सोडली. या सर्व खासदारांनी नव्या पक्षात प्रवेश केला. दरम्यान त्यानंतर तृणमूलचे नेते अभिषेक बॅनर्जी यांनी या बंडखोर खासदारांविरोधात सुप्रीम कोर्टात एक याचिका दाखल केली होती. ज्यामध्ये या सर्व बंडखोर खासदारांना अपात्र ठरवण्यात यावं अशी मागणी त्यांनी केली होती.

या प्रकरणात सुनावणीदरम्यान आता ममता बॅनर्जी यांच्या गटाला सुप्रीम कोर्टाने मोठा धक्का दिला आहे. अभिषेक बॅनर्जी यांच्या याचिकेवर सुनावणी करताना या वीस बंडखोर खासदारांबाबत निर्णय घेण्यासाठी लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांना वेळेचं कोणतंही बंधन घालता येत नसल्याचं न्यायालयाने म्हटलं आहे. ओम बिर्ला यांना वेळेचं कोणतंही बंधन सुप्रीम कोर्टाकडून घालण्यात आलेलं नाहीये. सरन्यायाधीश सूर्यकांत, जस्टिस जॉयमाल्या बागची आणि जस्टिस व्ही मोहना यांच्या खंडपीठापुढे या प्रकरणाची सुनावणी झाली आहे. आम्ही अशी आशा करतो की या प्रकरणावर लोकसभा अध्यक्ष लवकरात लवकर निर्णय घेतील, परंतु आम्ही त्यांना या प्रकरणावर त्यांनी लगेच निर्णय घ्यावा अशी सक्ती करू शकत नाही, असं यावेळी न्यायलयाने म्हटलं आहे. त्यामुळे आता ममता बॅनर्जी यांच्या अडचणी आणखी वाढण्याची शक्यता आहे. दरम्यान या वीस खासदारांबाबत आता लोकसभा अध्यक्ष ओम बिरला हे कधी निर्णय घेणार हे पहाणं महत्त्वाचं ठरणार आहे. या खासदारांविरोधात सुप्रीम कोर्टात याचिका दाखल आहे, तर दुसरीकडे निवडणूक आयोगाकडून तृणमूलचं चिन्ह देखील गोठवण्यात आलं आहे, त्यामुळे ममता बॅनर्जी यांच्या अडचणीत आता आणखी वाढ झाली आहे. यावरून ममता बॅनर्जी यांनी निवडणूक आयोगावर जोरदार हल्लाबोल केला होता.

# आदित्य मोटेगावकरवर दोन वर्षांची बंदी

■ लातूर (दै. संध्या)

नीट-युजी पेपरफुटी प्रकरणात कठोर कारवाई करत राष्ट्रीय परीक्षा एजन्सीने लातूरमधील प्रसिद्ध 'आरसीसी कोचिंग क्लासेस'चे संचालक व रसायनशास्त्राचे शिक्षक शिवराज मोटेगावकर यांना मोठा धक्का दिला आहे. एनटीएने शिवराज यांचे सुपुत्र आदित्य मोटेगावकर याच्यावर कारवाईचा बडगा उगारला असून, त्याला पुढील दोन वर्षांसाठी नीट परीक्षेस बसण्यास बंदी घातली आहे. तसेच, त्याची नीट युजी 2026 ची उमेदवारीही तात्काळ रद्द करण्यात आली आहे. 3 मे 2026 रोजी पार पडलेल्या नीट-युजी परीक्षेदरम्यान प्रश्नपत्रिका फुटल्याचा प्रकार उघडकीस आला होता. या प्रकरणात आदित्यने प्रश्नपत्रिका मिळवल्याचा किंवा ती इतरांना शेअर केल्याचा संशय व्यक्त करत एनटीएने त्याला 15 जुलै रोजी कारणे दाखवा नोटीस बजावली होती. मात्र, आदित्यने हे सर्व आरोप फेटाळून लावत एनटीएकडे पुरावे आणि सीबीआयच्या तपासाची माहिती मागितली होती. दरम्यान, परीक्षा रद्द झाल्यानंतर 20 जून रोजी घेण्यात आलेल्या पुनर्परीक्षेनंतर एनटीएने त्याचा निकाल राखून ठेवला होता. या संपूर्ण प्रकरणात सीबीआयने 17 सप्टेंबर रोजी एनटीएला एक अधिकृत पत्र पाठवले. या पत्रात स्पष्ट करण्यात आले की, मे 2026 मध्ये झालेल्या नीट प्रश्नपत्रिका फुटीच्या प्रकरणातील आदित्य मोटेगावकर हा थेट 'लाभार्थी' आहे. सीबीआयने दिलेल्या या महत्त्वपूर्ण अहवालामुळे आदित्यवरील संशय आणखी बळावला.

# निवडणूक आयोग पक्ष चोरणारी टोळी

## ज्ञानेश कुमारांना थेट तुरुंगात टाका : उद्धव ठाकरे



■ मुंबई (दै. संध्या)

निवडणूक आयोगातील अंतर्गत वादाच्या बातम्या समोर आल्यानंतर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी अत्यंत आक्रमक पवित्रा घेत निवडणूक आयोगावर गंभीर आरोप केला आहे. निवडणूक आयोग ही आता एक टोळी बनली असून, देशात लोकशाहीचा खून सुरू असल्याचा घणाघात त्यांनी पत्रकार परिषदेत केला. यावेळी आदित्य ठाकरे हेदेखील उपस्थित होते. ज्ञानेश कुमार यांनी निवडणूक प्रक्रियेत बेईमानी केली असून महाराष्ट्र, पश्चिम बंगाल आणि तामिळनाडूमध्ये बॅलेट पेपरवर नव्याने निवडणुका घेण्याची मागणी त्यांनी केली आहे. गेल्या काही वर्षांपासून निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. यावर बोलताना ठाकरे म्हणाले की, "निवडणूक आयोगाचे काम एका टोळीसारखे सुरू आहे. ही टोळी संपूर्ण देशात हैदोस घालत असून, पक्ष फोडणे, पक्ष चोरणे आणि लोकशाहीचा खून करणे हेच त्यांचे काम आहे." या संपूर्ण टोळीचा मुख्य सूत्रधार ज्ञानेश कुमार असून, त्यांचा विद्रूप आणि भीषण चेहरा आता जगासमोर आला आहे. त्यामुळे त्यांना तात्काळ तुरुंगात टाकले पाहिजे, अशी संतप्त मागणी उद्धव ठाकरे यांनी केली.

शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या बाबतीत आयोगाने दिलेल्या निकालांवर त्यांनी सडकून टीका केली. "पहिल्या पोटनिवडणुकीत आमचे नाव आणि चिन्ह गोठवले आणि नंतर कोणतीही शहानिशा न करता ते गद्दारांना दिले. तीच पद्धत शरद पवारांच्या पक्षाच्या बाबतीत वापरली गेली आणि आता तृणमूल काँग्रेससोबतही तेच सुरू आहे," असा आरोप त्यांनी केला.

याशिवाय, मतदार याद्यांमधील गोंधळावर बोट ठेवत ठाकरे म्हणाले की, "लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला यश मिळाल्यानंतर, विधानसभा निवडणुकीत तब्बल ४५ लाख बोगस मतदार यादीत नव्याने घुसडण्यात आले आहेत. ज्यांच्यामुळे हे आज सत्तेची गादी भोगत आहेत, त्या लालकृष्ण अडवाणी यांचेच नाव यादीतून वगळले गेले आहे. आपल्याला हवे ते मतदार ठेवायचे आणि नको ते वगळायचे, असा भयंकर प्रकार सुरू आहे."

**फेरनिवडणुका घेण्याची मागणी**

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी महाराष्ट्र, पश्चिम बंगाल आणि तामिळनाडू या राज्यांच्या निवडणूक प्रक्रियेत मोठा हस्तक्षेप केला असल्याचा आरोप करत, या तीनही राज्यांमधील निवडणुका तातडीने रद्द केल्या पाहिजेत, अशी मागणी ठाकरेंनी केली. तसेच, या राज्यांमध्ये पुन्हा नव्याने 'बॅलेट पेपर'वर (मतपत्रिकेवर) निवडणुका घेण्यात याव्यात, असे ते म्हणाले.

# शिक्षणाच्या बाजारीकरणामुळे व्यवस्थेचे नुकसान : राज ठाकरे

## *आत्महत्येमागे जात शोधण्यापेक्षा शिक्षण व्यवस्थेतील दोष सुधारा*

■ मुंबई (दै. संध्या)



आयआयटी मुंबईतील साहिल वाकोडे या 20 वर्षीय विद्यार्थ्याच्या आत्महत्येच्या दुर्दैवी घटनेनंतर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी तीव्र चिंता व्यक्त केली आहे. "या प्रकरणात जात आणि धर्माचा मुद्दा पुढे आणून मूळ समस्येपासून लक्ष भरकटवले जात आहे. विद्यार्थ्यांनी अशा विषारी राजकारणात अडकू नये, असे आवाहन राज ठाकरे यांनी केले आहे.

राज ठाकरे म्हणाले की, एखादा विद्यार्थी गैरप्रकार करत असेल तर त्याच्यावर नियमानुसार कारवाई करणे प्राध्यापकांचे कर्तव्य आहे. पण आरोप सिद्ध होण्याआधी मृत विद्यार्थ्याला गुन्हेगार ठरवणे जसे अयोग्य आहे, तसेच चौकशी पूर्ण होण्याआधी प्राध्यापकांना दोषी ठरवणेही चुकीचे आहे. एका तरुण मुलाला थेट आत्महत्येचा मार्ग का स्वीकारावा वाटला, या मूळ प्रश्नावर मात्र कोणीच बोलायला तयार नाही.

मनसे प्रमुख राज ठाकरे म्हणाले की, आयआयटी मुंबईमध्ये साहिल वाकोडे या वीस वर्षांच्या विद्यार्थ्याने आत्महत्या केल्याची अत्यंत दुर्दैवी घटना घडली. परीक्षेदरम्यान त्याने मोबाईल आणि चॅटजीपीटीचा वापर केल्याचा आरोप आयआयटी प्रशासनाने सुरुवातीला केला. हा आरोप तपास पूर्ण होण्याआधी जाहीर करणं अयोग्य होतं, हे मान्य करत प्रशासनाने नंतर माफीही मागितली. दुसरीकडे साहिलच्या कुटुंबीयांनी जातीय छळाचे आरोप केले आहेत. त्या आरोपांवर गुन्हा दाखल झाला असून तपास सुरू आहे. प्राध्यापकांनीही आपली बाजू मांडली आहे. या सगळ्या प्रकरणात एक तरुण मुलगा आपल्यातून गेला, त्याला थेट आत्महत्येचा मार्गच का स्वीकारावासा वाटला यावर कोणीच बोलताना दिसत नाहीये.

राज ठाकरे म्हणाले की, एखादा विद्यार्थी परीक्षेत गैरप्रकार करत असेल, तर त्याला रोखणं आणि त्याच्यावर नियमानुसार कारवाई करणं हे प्राध्यापकांचं कर्तव्यच आहे. पण आरोप सिद्ध होण्याआधी मृत विद्यार्थ्याला गुन्हेगार ठरवणं योग्य नाही. त्याचप्रमाणे जातीय छळाचा आरोप झाला म्हणून चौकशी पूर्ण होण्याआधी प्राध्यापकांना दोषी ठरवणंही योग्य नाही.

पण या सगळ्याचा कुठेच विचार होत नाही. कारण या विषयांत आता 'जात' हा मुद्दा पुढे आणून, एका वीस वर्षांच्या मुलाला एका प्रसंगानंतर आपल्या आयुष्याचे सगळे मार्ग संपले आहेत, असं का वाटलं असेल? यावर बोलायचं नाहीये. विचार करायचा नाहीये.



# संपादकीय

## आयआयटी मुंबईचे कठोर वास्तव दाखवा

आयआयटी मुंबई मध्ये घडलेल्या एका २२वर्षीय बीटेक विद्यार्थ्याच्या दुर्दैवी मृत्यूने संपूर्ण देशाचे लक्ष वेधून घेतले आहे. आत्महत्येची ही घटना अत्यंत दुर्दैवी आणि मन विषन्न करणारी आहे. एका तरुण हुशार विद्यार्थ्यांचा असा अकाली आणि वेदनादायी अंत होणे ही संपूर्ण शैक्षणिक व्यवस्थेसाठी धोक्याची घंटा आहे. या प्रकरणात साहिल बद्दल निश्चितच सहानुभूतीचा सूर असला पाहिजे एका कुटुंबाने आपला उमदा मुलगा गमावलेला आहे. हे दुःख कधीही भरून न येणारे आहे. परंतु या दुर्दैवी घटनेमागील कारणांचे विश्लेषण करताना भावनिकतेपेक्षा वस्तुस्थितीचा आणि निपक्षपातीपणाचा विचार करणे गरजेचे आहे. साहिल वाकोडे या विद्यार्थ्याच्या मृत्यूनंतर आयआयटी कॅम्पसमध्ये आंदोलन झाले, विविध मागण्या पुढे आल्या, प्राध्यापकावर गंभीर आरोप झाले आणि त्याचबरोबर विद्यार्थ्याच्या परीक्षेतील गैरप्रकाराची चर्चाही सुरू झाली.

या संपूर्ण प्रकरणाकडे पाहताना मात्र एक गोष्ट आपण विसरू नये.ही घटना केवळ एका विद्यार्थ्याची किंवा एका प्राध्यापकाची नाही. हा प्रश्न आपल्या शिक्षणव्यवस्थेतील आसंवेदनशीलता, शिस्त, विद्यार्थी-शिक्षक संबंध आणि सामाजिक समरसतेचा आहे.

सर्वप्रथम विद्यार्थ्याच्या मृत्यूबद्दल मनापासून दुःख व्यक्त करायला हवे. एका तरुणाने आपले आयुष्य संपवले, ही कोणत्याही परिस्थितीत अत्यंत वेदनादायक घटना आहे. त्याच्या कुटुंबाचे दुःख शब्दांत मांडणे कठीण आहे.

पण दुःखातून प्रश्न विचारताना न्यायाचा तोल सुटता कामा नये.

परीक्षेच्या वेळी विद्यार्थ्यांनी मोबाईल किंवा इतर इलेक्ट्रॉनिक साधने बाहेर ठेवावीत, अशा सूचना सर्वसाधारणपणे परीक्षा व्यवस्थेत दिल्या जातात. अशा सूचना असतानाही एखादा विद्यार्थी मोबाईल परीक्षा हॉलमध्ये घेऊन गेला असेल आणि त्याचा गैरवापर केल्याचे आढळले असेल, तर त्या घटनेची चौकशी होणे आणि संस्थेच्या नियमांनुसार कारवाई होणे स्वाभाविक आहे.

विद्यार्थ्याने नियम मोडला असेल तर त्याची जबाबदारी विद्यार्थ्याचीच असते.

पण त्याच वेळी दुसरा प्रश्नही तितकाच महत्त्वाचा आहे.त्या विद्यार्थ्याशी कारवाईच्या प्रक्रियेत नेमके कसे वागले गेले?

त्याला अपमानित केले गेले का?

धमकावले गेले का?

जातीय स्वरूपाची टिप्पणी करण्यात आली का?

की केवळ संस्थेच्या नियमानुसार परीक्षा गैरप्रकाराची नोंद करण्यात आली?

याचे उत्तर आंदोलनाच्या घोषणांमधून किंवा सोशल मीडियावरील चर्चेतून नव्हे, तर निष्पक्ष चौकशीतून मिळायला हवे.

आज या प्रकरणात जातीय भेदभावाचे गंभीर आरोप करण्यात आले आहेत. पोलिसांनी त्यासंदर्भात गुन्हाही नोंदवला आहे. परंतु आरोप म्हणजे दोषसिद्धी नाही. दुसरीकडे, आरोप झाले म्हणून त्याकडे दुर्लक्षही करता येणार नाही. दोन्ही बाजूंचे म्हणणे आणि उपलब्ध पुरावे तपासणे हीच न्यायाची पद्धत आहे.

याच कारणामुळे आयआयटी मुंबईने संबंधित प्राध्यापक सूर्यनारायण दुल्ला यांना त्यांच्या डीन पदाच्या प्रशासकीय जबाबदारीतून तात्पुरते दूर केले आहे. ते प्राध्यापक म्हणून कायम आहेत. हा निर्णय अंतिम दोषसिद्धी समजणे योग्य नाही. उलट, चौकशी सुरू असताना प्रशासकीय पदापासून दूर ठेवणे हा निष्पक्ष चौकशीसाठी घेतलेला तात्पुरता निर्णय म्हणून पाहता येतो. चौकशीत त्यांची कोणतीही चूक नसल्याचे स्पष्ट झाले तर पुढे त्यांना पुन्हा प्रशासकीय जबाबदारी मिळण्याचा मार्ग खुला आहे.

इथेच सामाजिक समरसतेची खरी परीक्षा आहे.

विद्यार्थी चुकीचा असेल तर तो विद्यार्थी आहे म्हणून त्याची चूक झाकायची नाही.

प्राध्यापकावर आरोप झाले म्हणून ते प्राध्यापक आहेत म्हणून त्यांना दोषी ठरवायचेही नाही.

"जात" हा मुद्दा असेल तर त्याचीही निष्पक्ष चौकशी झाली पाहिजे. जातीय भेदभाव झाला असेल तर दोषींवर कठोर कारवाई झालीच पाहिजे. पण जातीय भेदभाव झाला नाही, असे चौकशीत सिद्ध झाले तर केवळ वातावरणाच्या दबावामुळे एखाद्या व्यक्तीवर कायमचा कलंक लावणेही अन्यायकारक ठरेल.

त्याचप्रमाणे परीक्षेतील गैरप्रकार झाला असेल तर त्याचीही वस्तुनिष्ठ चौकशी झाली पाहिजे. विद्यार्थ्याने चॅट जीपीटीचा वापर केला होता की नाही, प्रश्नपत्रिका त्यावर अपलोड केली होती की नाही, त्याच्याकडे मोबाईल कशासाठी होता या सर्व प्रश्नांची उत्तरे डिजिटल आणि इतर पुराव्यांमधून मिळू शकतात.

विशेषतः आयआयटी मुंबईने सुरुवातीला या घटनेबाबत केलेल्या निवेदनानंतर सार्वजनिक माफी मागितली, कारण तपास पूर्ण होण्यापूर्वी मृत्यूच्या आधीच्या घटनांचा निश्चित निष्कर्षासारखा उल्लेख करणे योग्य नव्हते, असे संस्थेने मान्य केले.

यातून एक मोठा धडा मिळतो.

एखाद्या व्यक्तीच्या मृत्यूनंतर त्याच्याबद्दलही आणि त्याच्यावर आरोप असलेल्या व्यक्तीबद्दलही सार्वजनिक वक्तव्य करताना अत्यंत संयम आवश्यक आहे.

कारण मृत विद्यार्थी आपली बाजू मांडण्यासाठी आपल्यात नाही.

आणि आरोप असलेला प्राध्यापकही न्यायालयीन किंवा संस्थात्मक चौकशीपूर्वी दोषी ठरलेला नाही.

म्हणूनच या प्रकरणात विद्यार्थ्यांनी स्वतंत्र चौकशीची मागणी करणे समजण्यासारखे आहे. मानसिक आरोग्याच्या सुविधा वाढवणे, विद्यार्थ्यांच्या तक्रारींसाठी प्रभावी व्यवस्था निर्माण करणे, प्राध्यापक-विद्यार्थी संबंध अधिक संवेदनशील करणे अशा मागण्यांवर गंभीरपणे विचार होणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांनी अशा अनेक संस्थात्मक सुधारणांची मागणी केली आहे.

पण आंदोलनाचा उद्देश न्याय मिळवणे असेल तर तो न्याय सर्वांसाठी असला पाहिजे.

फक्त विद्यार्थ्यांसाठी नव्हे.

फक्त प्राध्यापकांसाठीही नव्हे.

आणि कोणत्याही राजकीय किंवा जातीय चौकटीसाठी तर अजिबात नव्हे.

आज आपल्याला 'कोण कोणाच्या बाजूचा?' हा प्रश्न विचारण्यापेक्षा 'सत्य कोणते?' हा प्रश्न विचारण्याची गरज आहे.

सामाजिक समरसता म्हणजे अन्याय झाकणे नव्हे.

सामाजिक समरसता म्हणजे जात पाहून न्यायाचे माप बदलू न देणे.

विद्यार्थी चुकला तर त्याला सुधारण्याची संधी देणे आणि नियमाप्रमाणे कारवाई करणे.

प्राध्यापकावर आरोप झाला तर निष्पक्ष चौकशी करणे आणि दोष सिद्ध झाला तर कारवाई करणे; पण दोष सिद्ध होईपर्यंत त्यांना सार्वजनिकरित्या गुन्हेगार ठरवू न देणे.

हीच खरी समरसता.

साहिलच्या मृत्यूचे खरे कारण काय होते, हे तपासातून समोर येईल. परीक्षेतील गैरप्रकार झाला होता का, प्राध्यापकाची भूमिका नेमकी काय होती, जातीय भेदभावाचे आरोप कितपत खरे आहेत आणि विद्यार्थ्याच्या मानसिक अवस्थेवर कोणत्या घटनांचा परिणाम झाला या सर्व प्रश्नांची उत्तरे पुराव्यांतूनच मिळायला हवीत.

तोपर्यंत एका तरुणाच्या मृत्यूचे राजकीय भांडवल करण्याऐवजी त्यातून शिक्षणव्यवस्थेला अधिक संवेदनशील आणि न्याय्य बनवण्याचा प्रयत्न व्हावा.

कारण एका विद्यार्थ्याला गमावण्याची वेळ पुन्हा कोणत्याही आई-वडिलांवर येऊ नये.

आणि एखाद्या निष्पाप प्राध्यापकाला केवळ आरोपांच्या आधारावर आयुष्यभराचा कलंकही सहन करावा लागू नये.

विद्यार्थ्याला न्याय मिळाला पाहिजे.

प्राध्यापकांनाही न्याय मिळाला पाहिजे.

आणि या दोन्ही न्यायांच्या मध्येच खरी सामाजिक समरसता उभी राहते. आयआयटी सारख्या देशातील सर्वोच्च शैक्षणिक संस्थेत कॉपी सारख्या गैरप्रकाराचे समर्थन कधीच होऊ शकत नाही. अशा नैतिक चुकीबद्दल विद्यार्थ्यांवर टीका होणे आणि नियमानुसार कारवाई होणे अपरिहार्य आहे. दुसरीकडे साहिलच्या पालकांनी प्राध्यापक सूर्यनारायण दुल्हा यांच्यावर मानसिक छळ आणि जातीय भेदभावाचे गंभीर आरोप केले आहेत. जर प्राध्यापक दुल्ला यांनी खरोखरच जातीच्या आधारे भेदभाव किंवा छळ केला असेल तर त्यांच्यावरील कायदेशीर कारवाईचे पूर्ण समर्थन व्हायला हवे. कोणत्याही शैक्षणिक संस्थांमध्ये जाती भेदभावाला अजिबात स्थान असता कामा नये प्राध्यापक दुल्हा हे कडक शिस्तीचे प्राध्यापक असल्यामुळे आणि त्यांनी कॉपी पकडली म्हणून त्यांच्या विरोधात जातीयवादाचे ढाल पुढे केली जात असेल तर ते अत्यंत दुर्दैवी आणि चुकीचे आहे. या संपूर्ण प्रकरणात आयआयटी मुंबई प्रशासनाची भूमिका अत्यंत बेजबाबदार आणि धरसोडीची राहिली आहे कोणत्याही चौकशीपूर्वी घाईघाईने विधाने करून विद्यार्थ्यांची प्रतिमा डागाळणे आणि नंतर विद्यार्थ्यांच्या तीव्र आंदोलनानंतर माघार घेत माफी मागणे यावरून प्रशासकीय ढिसाळपणा स्पष्ट दिसत आहे. आयआयटीमध्ये प्रवेश मिळाला आणि इंजिनियर झाले की प्रत्येकाला लाखो करोडो रुपयाची पॅकेज मिळून जीवन सुरक्षित होते. असा आभास निर्माण केला जातो.प्रत्यक्षात मात्र हे वास्तव नाही. आयटी मधून उत्तीर्ण झाल्यानंतरही अनेकांना चांगल्या नोकरीसाठी पुढील उच्च शिक्षण घ्यावे लागते. स्पर्धा परीक्षांना सामोरे जावे लागते. या कठोर वास्तवाची जाणीव विद्यार्थ्यांना आणि पालकांना वेळेवर करून देणे गरजेचे आहे. आयआयटी प्रशासनाने आता तरी केवळ गुणवत्तेचा आव न आणता विद्यार्थ्यांचे मानसिक आरोग्य. पारदर्शक प्रशासन. आणि भयमुक्त शैक्षणिक वातावरण निर्माण करण्यावर तातडीने कठोर पावले उचलली पाहिजे. आयटी शिक्षण संस्थेतील कठोर वास्तव शासनापुढे व समाजापुढे आणून त्यामध्ये मोठे फेरबदल करून आयआयटी मुंबईचा यापूर्वीचा प्रशासकीय लौकिक वाढवावा.

# दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना न्याय देणार - कृषीमंत्री दत्तात्रय भरणे

### दुष्काळसदृश परिस्थितीची कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांच्याकडून शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पिकांची पाहणी

■ बारामती (दै. संध्या)



राज्यातील दुष्काळी परिस्थितीची पाहणी मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री करत असून दुसरीकडे कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी आज बारामती उपविभागातील पीक परिस्थितीची पाहणी केली.बारामती तालुक्यातील मोरगाव आणि मुर्टी या भागातील शेतकऱ्यांच्या पिकांची बांधावर जाऊन त्यांनी पाहणी केली.परिसरातील दुष्काळसदृश परिस्थितीची प्रत्यक्ष पाहणी करून शेतकरी व ग्रामस्थांच्या अडचणी जाणून घेतल्या.यावेळी भरणे यांना टंचाईमधुन शेतीसाठी पुरंदर उपसा सिंचन योजनेचे मोफत पाणी मुर्टी व परिसराला मिळावे अशी मागणी शेतकरी व ग्रामस्थांच्याकडून करण्यात आली. पावसातील दीर्घ खंडामुळे पुणे विभागातील खरीप पिकांवरही परिणाम झाला आहे. या परिस्थितीची केवळ आकडेवारीच्या आधारे पाहणी न करता प्रत्यक्ष क्षेत्रावर जाऊन वस्तुस्थिती जाणून घेणे महत्त्वाचे असल्याचे कृषिमंत्री भरणे यांनी यावेळी सांगितले. मुख्यमंत्र्यांनी आजपासूनच पंचनामे करण्याचे आदेश दिले असून,कृषी व संबंधित विभागांकडून प्रत्यक्ष शेतावर जाऊन नुकसानीची अचूक नोंद करण्यात येत आहे. पावसातील खंड,पिकांची सद्यस्थिती आणि त्याचा पिकांवर झालेला परिणाम लक्षात घेऊन पंचनामे तसेच आवश्यक प्रस्तावांची कार्यवाही तातडीने पूर्ण करण्यात येईल, असा विश्वासही कृषिमंत्री भरणे यांनी व्यक्त केला.त्यानंतर ते पुरंदर तालुक्यातील कोळविहिरे व नावळी या गावातील पीक परिस्थितीची पाहणी करण्यासाठी ते रवाना झाले.पुणे जिल्ह्यातील पूर्व भागातील इंदापूर, दौंड,बारामती,पुरंदर या चार तालुक्यांमध्ये या संपूर्ण पावसाळ्यात अतिशय कमी पाऊस झाला असून अनेक ठिकाणी दुष्काळी परिस्थितीमुळे पिके जळून गेली आहेत.यावर्षी मोठा दुष्काळ शेतकऱ्यांना पाहण्याची वेळ येणार असून त्याच पार्श्वभूमीवर सरकारने दुष्काळी परिस्थितीची पाहणी करून या तालुक्यांचा समावेश गंभीर दुष्काळी परिस्थितीमध्ये करावा आणि त्याचबरोबर शेतकऱ्यांना मदत करावी अशी मागणी या भागातील शेतकऱ्यांकडून सातत्याने होत आहे. या पार्श्वभूमीवर कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी आज बारामती,दौंड आणि पुरंदर तालुक्यातील पीक परिस्थितीची पाहणी केली.यावेळी त्यांच्यासमवेत पुणे जिल्हा परिषदेचे अध्यक्ष वीरधवल जगदाळे,जिल्हा परिषद सदस्या रोहिणी कदम ढोले,बारामती पंचायत समितीचे सभापती किरण तावरे व पंचायत समितीचे सदस्य, कृषी तसेच विविध विभागातील अधिकारी,आजी-माजी पदाधिकारी,सरपंच,उपसरपंच, कार्यकर्ते,शेतकरी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ग्राहकांनी 'स्मार्ट सोलर' योजनेचा लाभ घ्यावा – दिग्विजय ठोंबरे

■ बारामती (दै. संध्या)




घरगुती वीज ग्राहकांमध्ये सौरऊर्जेचा वापर वाढविण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या 'स्वयंपूर्ण महाराष्ट्र आवासीय रूफटॉप सोलार (स्मार्ट) योजनेचा' पात्र ग्राहकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन महावितरणचे सहायक अभियंता दिग्विजय ठोंबरे यांनी केले. साने गुरुजी तरुण मित्र मंडळ, आमराई येथे माहिती व जनसंपर्क विभागामार्फत आयोजित 'लोकसंवाद' कार्यक्रमात त्यांनी नागरिकांना योजनेची माहिती दिली. केंद्र सरकारच्या पीएम सूर्यघर योजनेशी संलग्न असलेल्या या योजनेअंतर्गत पात्र घरगुती ग्राहकांना छतावर सौरऊर्जा प्रकल्प उभारण्यासाठी केंद्रीय आर्थिक सहाय्य मिळते. १ व २ किलोवॅट क्षमतेसाठी प्रति किलोवॅट ३० हजार रुपये, तर ३ किलोवॅटपर्यंतच्या अतिरिक्त क्षमतेसाठी प्रति किलोवॅट १८ हजार रुपये केंद्रीय सहाय्य उपलब्ध आहे. त्यामुळे ग्राहकांचा सौर प्रकल्प उभारणीवरील आर्थिक भार कमी होण्यास मदत होते. सौर प्रकल्प उभारल्यानंतर पाच वर्षे त्याच्या देखभालीची जबाबदारी महावितरणमार्फत नियुक्त सेवा पुरवठादाराकडे राहते. पात्र ग्राहकांनी अधिकृत प्रक्रियेद्वारे अर्ज करून या योजनेचा लाभ घ्यावा, असेही श्री. ठोंबरे यांनी सांगितले. कार्यक्रमास नगरसेवक बिरजू भैया मांढरे आणि गणेश मंडळाचे अध्यक्ष प्रथमेश अर्जुन काशीद उपस्थित होते.

## सामाजिक न्याय विभागाच्या योजनांची 'लोकसंवाद'मधून माहिती

### विद्यार्थ्यांनी शासकीय वसतिगृह योजनेचा लाभ घ्यावा : अधीक्षिका सविता खारतोडे

■ बारामती (दै. संध्या)




माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत राज्यभर राबविण्यात येणाऱ्या 'लोकसंवाद' उपक्रमातून श्री. विघ्नहर्ता मित्र मंडळ, जुनी कचेरी रोड तसेच आशीर्वाद मित्र मंडळ, मारवाड पेठ येथे सामाजिक न्याय विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती नागरिकांना देण्यात आली. विद्यार्थ्यांनी शासकीय वसतिगृह योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन समाजकल्याण विभागाच्या वसतिगृह अधीक्षिका सविता खारतोडे यांनी केले.

सामाजिक न्याय विभागामार्फत राज्यभर मुला-मुलींसाठी शासकीय वसतिगृहे चालविली जातात. प्रत्येक तालुक्यात १०० विद्यार्थी क्षमतेची मुला-मुलींची शासकीय वसतिगृहे उपलब्ध आहेत. या वसतिगृहांमध्ये विद्यार्थ्यांना दरमहा १ हजार रुपये तसेच मुलींना अतिरिक्त १५० रुपये स्वच्छता भत्ता देण्यात येतो. यासोबतच पौष्टिक व दर्जेदार भोजन, अभ्यासिका, संगणक, मोफत वायफाय, शैक्षणिक साहित्यासाठी दरवर्षी ४ हजार रुपये आणि गणवेशासाठी २ हजार रुपये यांसह विविध सुविधा उपलब्ध करून देण्यात येतात. शासकीय वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या अनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना राबविण्यात येते. या योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांना भोजन, निवास तसेच इतर शैक्षणिक खर्चासाठी थेट आर्थिक मदत अनुदानाच्या स्वरूपात देण्यात येते. ही रक्कम विद्यार्थ्यांच्या आधार-संलग्न बँक खात्यात थेट जमा केली जाते, अशी माहितीही श्रीमती खारतोडे यांनी दिली. 'लोकसंवाद' उपक्रमाच्या माध्यमातून सामाजिक न्याय विभागाच्या योजनांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासोबतच पात्र लाभार्थ्यांनी योजनांचा लाभ घेण्यासाठी आवश्यक प्रक्रिया व सुविधांची माहिती करून घ्यावी, असे आवाहन करण्यात आले.

## ज्ञानसागरच्या सार्थक ताकमोगेची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड

■ राज्यस्तरीय वुशू स्पर्धेसाठी सार्थकची निवड

■ छत्रपती संभाजीनगर येथे रंगणार राज्यस्तरीय स्पर्धा

■ सावळ (दै. संध्या)



क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य,पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय,जिल्हा क्रीडा परिषद, अहिल्यानगर तसेच ल.ना. होशिंग माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय,जामखेड आणि अहिल्यानगर जिल्हा अमॅच्युअर वुशू असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पुणे विभागीय शासकीय शालेय वुशू क्रीडा स्पर्धा २०२६-२७ नुकत्याच जामखेड, जि.अहिल्यानगर येथे उत्साहात पार पडल्या.या स्पर्धेत ज्ञानसागर गुरुकुल,सावळ चा विद्यार्थी सार्थक सुदर्शन ताकमोगे याने आपल्या उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत १७ वर्षे वयोगटातील ५६ किलो वजन गटात पुणे विभागात प्रथम क्रमांक पटकावला. आपल्या आक्रमक खेळशैली,उत्तम तंत्र,वेग आणि आत्मविश्वासाच्या जोरावर सार्थकने प्रतिस्पर्ध्यांवर मात करत विभागीय स्तरावर विजेतेपद मिळविले.या उल्लेखनीय कामगिरीमुळे सार्थक ताकमोगे याची शालेय राज्यस्तरीय वुशू क्रीडा स्पर्धेसाठी निवड झाली आहे.राज्यस्तरीय स्पर्धा दि. २८ व २९ सप्टेंबर २०२६ रोजी छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित करण्यात येणार असून,या स्पर्धेत सार्थक पुणे विभागाचे प्रतिनिधित्व करणार आहे.

"सार्थकने विभागीय स्पर्धेत मिळविलेले प्रथम क्रमांकाचे यश हे त्याच्या सातत्यपूर्ण सरावाचे, मेहनतीचे आणि क्रीडा प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाचे फलित आहे.शालेय स्तरावरून विभागीय स्तरापर्यंत मजल मारत आता राज्यस्तरीय स्पर्धेत सहभागी होण्याची संधी त्याला मिळाली आहे. त्यामुळे ज्ञानसागर गुरुकुलच्या क्रीडा क्षेत्रातील यशाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे." असे प्रतिपादन संस्थेचे अध्यक्ष डॉ.सागर मानसिंग आटोळे यांनी केले.सार्थकच्या या यशाबद्दल ज्ञानसागर गुरुकुलचे संस्थापक-अध्यक्ष डॉ.सागर आटोळे,संस्थेचे पदाधिकारी, प्राचार्य,शिक्षकवृंद,क्रीडा विभाग तसेच सर्व विद्यार्थी यांनी त्याचे अभिनंदन केले. राज्यस्तरीय स्पर्धेसाठी त्याला शुभेच्छा देताना आगामी स्पर्धेतही उत्तम कामगिरी करण्यासाठी आवश्यक ते मार्गदर्शन व प्रोत्साहन देण्यात येत असल्याचे सांगण्यात आले. "मेहनत,शिस्त,सातत्यपूर्ण सराव आणि आत्मविश्वास यांच्या जोरावर विद्यार्थ्यांना क्रीडा क्षेत्रातही उत्तुंग भरारी घेता येते," हे सार्थकच्या यशातून पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे.

ज्ञानसागर गुरुकुलमध्ये शिक्षणाबरोबरच क्रीडा,शारीरिक तंदुरुस्ती आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला विशेष महत्त्व दिले जाते. विविध क्रीडा प्रकारांमध्ये विद्यार्थ्यांना प्रशिक्षण व स्पर्धेच्या संधी उपलब्ध करून दिल्या जात असून,त्यातून अनेक विद्यार्थी जिल्हा,विभागीय आणि राज्यस्तरावर उल्लेखनीय कामगिरी करत आहेत.

सार्थक ताकमोगे याची राज्यस्तरीय वुशू स्पर्धेसाठी झालेली निवड ही ज्ञानसागर गुरुकुलसाठी अभिमानाची बाब असून,छत्रपती संभाजीनगर येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी त्याच्याकडून उत्कृष्ट कामगिरीची अपेक्षा व्यक्त होत आहे.

## उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी स्वीकारली निवेदने

### समस्यांवर तातडीने कार्यवाही करण्याच्या संबंधित प्रशासनाला सूचना



■ बारामती (दै. संध्या)

सोमेश्वर सहकारी साखर कारखान्याच्या पंचवार्षिक निवडणुकीसंदर्भात इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती घेतल्या नंतर उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्रावहिनी अजितदादा पवार यांनी बारामतीमधील नागरिक, पदाधिकारी,कार्यकर्ते व विविध घटकांच्या भेटी घेतल्या.

यावेळी नागरिकांनी आपल्या विविध अडचणी व प्रश्न मांडत उपमुख्यमंत्री सुनेत्रा वहिनी पवार यांच्याकडे निवेदने सादर केली. सुनेत्रा वहिनींनी प्रत्येकाची अडचण समजून घेत संबंधितांकडून माहिती जाणून घेतली. नागरिकांनी मांडलेल्या प्रश्नांवर तातडीने आवश्यक कार्यवाही करून त्यावर मार्ग काढण्याच्या सूचना त्यांनी संबंधित प्रशासन व अधिकाऱ्यांना दिल्या. नागरिकांच्या अडचणी सोडविण्यासाठी प्रशासनाने संवेदनशीलतेने आणि तत्परतेने काम करावे,असेही त्यांनी स्पष्ट केले.

नागरिकांच्या समस्या ऐकून घेऊन त्यावर तत्काळ कार्यवाही करण्याची भूमिका उपमुख्यमंत्री सुनेत्रा वहिनी पवार यांनी यावेळी अधोरेखित केली.

## पुरंदर तालुका शिक्षकेतर संघाच्या अध्यक्षपदी संदिप चाचर, सचिवपदी रामचंद्र भोसले बिनविरोध

■ सासवड (दै. संध्या)







पुरंदर तालुका शिक्षकेतर संघाची नूतन कार्यकारिणी नुकतीच सासवड येथील पुरंदर हायस्कूलमध्ये पार पडलेल्या निवडणुकीत बिनविरोध निवडण्यात आली. यामध्ये हिवरे येथील गुरुवर्य नारायण महाराज माध्यमिक विद्यालयाचे लेखनिक संदिप चाचर यांची अध्यक्षपदी, तर कोथळे येथील विद्या महामंडळ प्रशालेचे लेखनिक रामचंद्र भोसले यांची सचिवपदी आणि किर्तीकुमार मेमाणे यांची कार्याध्यक्षपदी सर्वसंमतीने निवड झाली. या निवडणुकीसाठी महाराष्ट्र राज्य व पुणे जिल्हा शिक्षकेतर महामंडळाचे सरकार्यवाह शिवाजीराव खांडेकर यांनी मार्गदर्शन केले, तर निवडणूक कामकाज अधिकारी म्हणून विनोद गोरे आणि संजय धुमाळ यांनी काम पाहिले. या प्रसंगी पुरंदर तालुका शिक्षक संघाचे अध्यक्ष दत्ता रोकडे उपस्थित होते.

सन २०२६ ते २०२९ ची नूतन कार्यकारिणी पुढीलप्रमाणे : अध्यक्ष: संदिप चाचर (हिवरे), सचिव: रामचंद्र भोसले (कोथळे), कार्याध्यक्ष : किर्तीकुमार मेमाणे (पारगाव मेमाणे), कार्यकारिणी सदस्य : अशोक बाणे (यादववाडी), संपतराव कड (जेजुरी), ज्ञानदेव ठोंबरे (एखतपूर), महेश माने (निरा).

कार्यक्रमाचे नियोजन पांडुरंग जाधव, सोमनाथ शेंडगे, सिद्राम कांबळे आणि दत्ता शिर्के यांनी केले. निवडीनंतर सर्व नूतन पदाधिकाऱ्यांचा सत्कार करून त्यांचे अभिनंदन करण्यात आले.

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले. संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे



## पुणे फेस्टिव्हलमध्ये रंगला 'सत्यशोधक महात्मा' चा प्रयोग

**पुणे : दैनिक संध्या**

भारतीय समाजव्यवस्थेचा तपशिलाने अभ्यास करून, जातींची विषमता दूर करण्यासाठी महात्मा ज्योतिराव फुले यांनी आयुष्यभर जो संघर्ष केला आणि जो लढा दिला, त्याचे अत्यंत प्रत्ययकारी सादरीकरण 'सत्यशोधक महात्मा' या नाट्यप्रयोगाच्या निमित्ताने प्रेक्षकांनी अनुभवले. मूळ ताकदीचे लेखन, नेमकी रंगावृत्ती, जाणते दिग्दर्शन आणि कलाकारांचा अप्रतिम अभिनय, यामुळे हा प्रयोग अविस्मरणीय ठरला. पुणे फेस्टिव्हल अंतर्गत बालगंधर्व रंगमंदिरात सोमवारी सायंकाळी 'सत्यशोधक महात्मा' हे नाटक सादर झाले. महात्मा फुले यांच्या जन्मद्विशताब्दी वर्षाचे औचित्य साधून संवाद, पुणे तर्फे सुनील महाजन यांनी सादर केले असून, गौरी राहुल ढोले पाटील आणि निकिता मोघे या निर्मात्या आहेत. डॉ. रवी चौधरी आणि केतकी बोरकर यांचे निर्मिती साह्य मिळाले आहे. नाटकात गणेश इनामदार, अरुंधती कामठे, गायत्री वाडकर, दिलीप आंग्रे, वसंत भडके, आयुष वाघ, ओंकार मोहिते यांनी भूमिका साकारल्या आहेत. काल झालेल्या प्रयोगापूर्वी या सर्व मान्यवरांचा गौरव पुणे फेस्टिव्हलचे अध्यक्ष कृष्णकुमार गोयल, सांस्कृतिक कार्यक्रम मुख्य संयोजक डॉ.. सतीश देसाई, विश्वस्त मोहन टिल्लू यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी कमलताई ढोले पाटील, पूना क्लबचे अध्यक्ष राहुल ढोले पाटील, फुले वसतिगृहाचे विश्वस्त अरुण कुदळे यांचाही सन्मान करण्यात आला. निर्मात्या गौरी ढोले पाटील म्हणाल्या, 'महात्मा फुले यांच्या जन्मद्विशताब्दी वर्षानिमित्त हे नाटक पुन्हा सादर करत आहोत. फुले यांचे विचार कालातील असून, समाजातील सर्व घटकांसाठी सामाजिक समतेचा संदेश त्यांनी दिला आहे. कृष्णकुमार गोयल यांनी फुले यांचा समतेचा विचार सर्वत्र पोहोचण्यासाठी नाटकाचे माध्यम प्रभावी ठरेल, असे मत मांडले. नाटकाचे मूळ लेखन प्रसिद्ध लेखक रामनाथ चव्हाण यांचे असून, रंगावृत्ती आणि दिग्दर्शन योगेश सोमण यांचे आहे. सामाजिक समता, स्त्रीशिक्षण, तसेच वंचितांच्या हक्कांसाठी फुले यांनी केलेले लोकोत्तर कार्य या नाटकातून प्रेक्षकांसमोर आले. नाटकात वापरण्यात आलेले ज्योतिबांचे अखंड (अभंग) प्रभावी ठरले आणि वेळोवेळी प्रेक्षकांनी या अखंड सादरीकरणाला दाद दिली. स्वतः उत्तम शिक्षण प्राप्त केल्यावर, सामाजिक विषमतेविरोधात ज्योतिबांनी दिलेला लढा, विचारलेले प्रश्न, केलेला संघर्ष आणि अखंड या माध्यमातून व अन्य लेखनातून सातत्याने केलेला वैचारिक प्रचार-प्रसार...या संघर्षाचे कौटुंबिक जीवनावर झालेले परिणाम, मतभेद यांचेही दर्शन नाटकातून घडले. स्त्रीशिक्षणाचे त्यांना पटलेले महत्त्व, त्यासाठी घरच्या स्त्रीला आधी शिक्षित करण्याचा निर्मय, काशीबाईंचा प्रसंग, पेठांमध्ये पोस्टर लावणे, यशवंतला दत्तक घेण्याचा निर्णय, सत्यशोधकची स्थापना....या सर्वच टप्प्यांवरचे ज्योतिबा या नाटकांतून प्रेक्षकांच्या संवेदनशीलतेला जागृत करतात आणि आजच्या पिढीलाही नव्याने उमगत जातात. सुटसुटीत नेपथ्य आणि अखंड रचनांचा वापर नेमकेपणाने केल्याने नाटकाचा आशय आणि संदेश अधोरेखित होतात.

## दि. २३ व २४ सप्टेंबर रोजी चित्रकला प्रदर्शन अभिनेते मोहन जोशी यांच्या हस्ते उद्घाटन

**पुणे : दैनिक संध्या**

पुणे फेस्टिव्हलमध्ये बुधवार दि. २३ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता बालगंधर्व कलादालन येथे सुप्रसिद्ध अभिनेते श्री. मोहन जोशी यांच्या हस्ते चित्रकला प्रदर्शनाचे उद्घाटन होणार आहे. या प्रसंगी कार्यक्रमास राष्ट्रीय पारितोषिक विजेते चित्रकार चिंतामणी हसबनीस पुणे फेस्टिवलचे अध्यक्ष कृष्णकुमार गोयल उपस्थित राहणार आहेत. संयोजिका एडवोकेट अनुराधा भारती आहेत. पुणे फेस्टिवलमध्ये आकृती चित्रकला प्रदर्शनाचे हे १९वे वर्ष असून यंदाच्या वर्षी सुप्रसिद्ध कलाकार सतीश गुजराल यांच्या विलक्षण कलाप्रवासाचे दर्शन घडवणारे एक आगळेवेगळे प्रदर्शन भरवले जाणार आहे. एका राष्ट्राला आकार देणाऱ्या कलेचे साक्षीदार होण्याची संधी सर्व कलाप्रेमींना मिळणार आहे. सतीश गुजराल यांचा सात दशकांचा वारसा, त्यांची भव्य भित्तिचित्रे आणि कालातीत दृष्टी यांचा उत्सव साजरा करणाऱ्या या विशेष प्रदर्शनात एकूण ८० चित्र, ३० चित्रकार व एसएनडीटी कॉलेजच्या २० विद्यार्थिनी व तसेच श्रीमती शकुंतला हेमराज मुथा चित्रकला महाविद्यालयाच्या २५ विद्यार्थिनींनी भाग घेतला आहे.

## नेताजी सुभाषचंद्रांच्या लोकोत्तर कार्याला 'जयहिंद'च्या माध्यमातून मानवंदना

**पुणे : दैनिक संध्या**

देशाच्या स्वातंत्र्यसमरातील सर्वांत प्रेरक, स्फूर्तीदायक आणि देशप्रेमाने ओतप्रोत भरलेले पर्व म्हणजे नेताजी सुभाषचंद्र बोस यांचे कार्यकर्तृत्व आणि आझाद हिंद फौजेच्या निर्मितीतून त्यांनी छेडलेले स्वातंत्र्ययुद्ध...नेताजींच्या आझाद हिंद सेनेच्या वाद्यवृंदाची विस्मृतीत गेलेली गीते 'जयहिंद' या कार्यक्रमांतून सादर झाली आणि त्या चैतन्यमय गीतांच्या सादरीकरणातून नेताजींचे प्रभावी व्यक्तिमत्त्व, त्यांचे लोकोत्तर कार्य, स्वातंत्र्याची तळमळ, त्यासाठी केलेला अपूर्व त्याग आणि याच गुणांचे पाथेय आपल्या सैनिकांना देण्याचे त्यांचे सामर्थ्य...यांचा प्रत्यय प्रेक्षकांना मिळाला. पुणे फेस्टिव्हल अंतर्गत सोमवारी रात्री बालगंधर्व रंगमंदिरात 'जयहिंद'चे प्रेरणादायी सादरीकरण झाले. नेताजींच्या आझाद हिंद सेनेचा वाद्यवृंद, त्यासाठी लिहिली गेलेली स्फूर्तीगीते (मार्चिंग सॉन्ग्ज) यांचा शोध घेऊन त्या गीतांचे संकलन, साजेशी संहिता, निवेदन आणि समन्वयन प्रदीप निफाडकर यांनी केले होते. निर्मिती पुणे फेस्टिव्हलचे अध्यक्ष कृष्णकुमार गोयल यांची होती. व्यवस्थापन सौ. अनिता निफाडकर यांचे होते. संगीतासह गायन सहभाग शंतनु पानसे, केतन गोडबोले, डॉ. अनघा जोशी यांचा होता. संगीत संयोजन केदार परांजपे यांचे होते. केदार तळणीकर (तबला), संदीप बंकापुरे (ऱ्हिदम) यांनी साथ केली. निर्माते आणि पुणे फेस्टिव्हलचे अध्यक्ष कृष्णकुमार गोयल यांच्या हस्ते कलाकारांचे सत्कार करण्यात आले. महाराष्ट्र साहित्य परिषदेचे अध्यक्ष योगेश सोमण,कार्यवाह प्रसाद मिरासदार, जलतजज्ञ डॉ मंगेश कश्यप, दिलीपराज प्रकाशनचे राजीव बर्वे, आळेगावचे माजी सरपंच विजय कुऱ्हाडे, ह.भ.प. नीलिमाताई पाटोळे आदी उपस्थित होते विश्वस्त मोहन टिल्लू बालगंधर्व कार्यक्रम समन्वयक श्रीकांत कांबळे यावेळी उपस्थित होते. निफाडकर यांनी संकलित केलेल्या ४० गीतांपैकी १४ गीतांचे सादरीकरण जयहिंद या कार्यक्रमात झाले. जनगणमन या राष्ट्रगीताचा हिंदी अनुवाद आवर्जून सादर करत कार्यक्रमाची सुरवात झाली. पाठोपाठ 'गयी रात आया प्रभात हम निद्रा से जागे..'हे गीत प्रभावशाली ठरले. 'नवयुग आया, जीवन लाया...'असा आशावाद त्यात व्यक्त झाला होता.

# ३८व्या पुणे फेस्टिव्हलमध्ये 'मराठी बाणा' संपन्न

■ पुणे(दै. संध्या)



पुणे फेस्टिव्हल हा केवळ सांस्कृतिक महोत्सव नसून, त्यामागे दिवंगत नेते सुरेश कलमाडी यांची दूरदृष्टी असल्याचे प्रत्यक्ष महोत्सवाला भेट दिल्यानंतर जाणवले. पुणे फेस्टिव्हल आगामी काळात अधिक व्यापक आणि शाश्वत स्वरूपात सुरू राहिला पाहिजे, अशी अपेक्षा काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी व्यक्त केली.

गणेश कला-क्रीडा रंगमंदिर येथे निर्माते, लेखक व दिग्दर्शक अशोक हांडे यांच्या 'मराठी बाणा ७० एमएम' या कार्यक्रमाचे उद्घाटन सपकाळ यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी पुणे फेस्टिव्हलचे दिवंगत संस्थापक सुरेश कलमाडी यांच्या तैलचित्रास त्यांनी पुष्पहार अर्पण केला. पुणे फेस्टिव्हलचे अध्यक्ष कृष्णकुमार गोयल, मुख्य संयोजक ॲड. अभय छाजेड, माजी गृहराज्यमंत्री रमेश बागवे, सांस्कृतिक कार्यक्रम मुख्य संयोजक डॉ. सतीश देसाई, काँग्रेसचे वरिष्ठ प्रवक्ते गोपाळ तिवारी, कॉंग्रेस शहराध्यक्ष (पूर्व विभाग) प्रशांत जगताप, अशोक हांडे, नगरसेवक सुनील शिंदे, बाळासाहेब अमराळे, निरुद्दीन सोमजी, सुनील मलके, सौरभ अमराळे आणि सचिन आडेकर उपस्थित होते.

सपकाळ म्हणाले, "माझ्या गावात अनेक वर्षांपासून वृत्तपत्रांच्या माध्यमातून पुणे फेस्टिव्हलबाबत वाचत होतो. मात्र, आज प्रत्यक्ष महोत्सवाला भेट दिल्यानंतर त्याची व्याप्ती आणि महती समजली. यातून सुरेश कलमाडी यांची दूरदृष्टी प्रत्ययास येते. नियतीने कलमाडी यांना आपल्यातून हिरावून घेतले असले, तरी पुणे फेस्टिव्हलच्या माध्यमातून त्यांची ओळख आजही कायम आहे." पुणे फेस्टिव्हल हा सर्वसमावेशक सांस्कृतिक उपक्रम असल्याचे सांगत सपकाळ यांनी सामाजिक सलोख्याचाही मुद्दा मांडला. समाजात जाती-धर्मांमधील भेदभावाची दरी वाढत असताना संस्कृतीच्या नावाखाली एकाच विचाराची व्याख्या पुढे केली जात असल्याचे ते म्हणाले. साने गुरुजींच्या विचारांचा संदर्भ देत, "स्वतःच्या ताटातील अन्न सर्वांनी वाटून खाणे हीच खरी भारतीय संस्कृती आहे," असेही त्यांनी नमूद केले. पुणे फेस्टिव्हलचे अध्यक्ष कृष्णकुमार गोयल म्हणाले, "यंदा पुणे फेस्टिव्हलच्या माध्यमातून 'अंधमुक्त पुणे' हे अभियान हाती घेण्यात आले असून नेत्रदानाबाबत जनजागृती केली जात आहे. यंदा विविध विषयांवरील एकूण ५३ विनामूल्य कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. नागरिकांनी या कार्यक्रमांचा लाभ घ्यावा." पुणे फेस्टिव्हल हा पुणेकरांचा महोत्सव असल्याचे सांगत, पुढील वर्षी कोणता नवीन कार्यक्रम पाहायला आवडेल, याबाबत नागरिकांनी सूचना कराव्यात, असे आवाहनही त्यांनी केले. दरम्यान, अशोक हांडे दिग्दर्शित 'मराठी बाणा-७० एमएम' या कार्यक्रमातून महाराष्ट्राची लोकपरंपरा, संतपरंपरा, सण-उत्सव आणि लोककलेचे विविध पैलू गीत-नृत्याच्या माध्यमातून सादर करण्यात आले. रसिकांच्या उत्स्फूर्त प्रतिसादात हा कार्यक्रम रंगला. गणेश कला-क्रीडा रंगमंदिरात अडीच हजारांहून अधिक रसिकांची उपस्थिती; टाळ्या, शिट्ट्या आणि 'वन्स मोअर'ने कलाकारांना दाद मराठी संस्कृती, परंपरा, लोककला आणि संतपरंपरेचे वैभव गीत-नृत्याच्या माध्यमातून उलगडणाऱ्या निर्माते, लेखक व दिग्दर्शक अशोक हांडे यांच्या 'मराठी बाणा-७० एमएम' या कार्यक्रमाने पुणेकर रसिकांची मने जिंकली. गणेश कला-क्रीडा रंगमंदिरात झालेल्या या कार्यक्रमाला हाऊसफुल प्रतिसाद मिळाला. अडीच हजार आसने भरल्यानंतरही अनेक रसिकांनी उभे राहून कार्यक्रमाचा आनंद घेतला. टाळ्या, शिट्ट्या आणि 'वन्स मोअर'च्या उत्स्फूर्त प्रतिसादाने संपूर्ण रंगमंदिर दुमदुमून गेले. 'उठी उठी गोपाळा...' या भक्तिरसपूर्ण गीताने कार्यक्रमाची शानदार सुरुवात झाली. त्यानंतर 'कोंबडा अरवला... झुंज मुंज पहाट झाली' यांसारख्या गीतांनी महाराष्ट्राच्या ग्रामीण जीवनाचे रंगमंचावर दर्शन घडविले.

### 'एकविरा आई तू डोंगरावरी'

'एकविरा आई तू डोंगरावरी' या कोळी गीताने वातावरणात वेगळाच उत्साह निर्माण केला. रसिकांनीही या गीताच्या तालावर ठेका धरत शिट्ट्या वाजवून कलाकारांना दाद दिली. मंगळागौरीची पारंपरिक गाणी, संतांच्या शिकवणीचा संदेश देणारे भारूड, गोपाळकाला, गणेशोत्सव तसेच महाराष्ट्रातील विविध सण-उत्सवांवर आधारित गीत-नृत्यांनी कार्यक्रम अधिक रंगतदार झाला.

तमाशातील ढोलकीच्या तालावर सादर झालेल्या गीतांनी मराठी लोककलेचे वैभवही प्रभावीपणे अधोरेखित केले. कार्यक्रमाचे नृत्यदिग्दर्शन सुभाष नकाशे यांनी केले. सचिन मुळे, रुद्रेश कानविंदे, रवी आल्हाट, नागेश मोरवेकर तसेच कस्तुरी वावरे, अस्मिता काळे, नंदा भामरे आणि पूजा वनकर यांनी आपल्या दमदार गायनाने कार्यक्रमात रंगत आणली. ध्वनी व्यवस्था दिलीप बोनाटे, तर प्रकाशयोजना सुनील जाधव यांनी सांभाळली.

### महाराष्ट्राची संस्कृती समृद्ध

अशोक हांडे यांनी आपल्या ओघवत्या शैलीत महाराष्ट्राच्या संस्कृतीचे महत्त्व विशद केले. 'मराठी मातीचा गुण श्रमाला महत्त्व देणारा आहे. विविध सण, परंपरा आणि लोककलांमधून महाराष्ट्राची संस्कृती समृद्ध झाली आहे. अध्यात्म आणि संस्कार यांची सांगड महाराष्ट्रीय संस्कृतीने घातली आहे,' असे त्यांनी सांगितले. पुणे फेस्टिव्हलचे संस्थापक सुरेश कलमाडी यांनी सुरू केलेली सांस्कृतिक परंपरा आजही दिमाखात सुरू असल्याचा आनंद असल्याचे हांडे यांनी नमूद केले. पुणे फेस्टिव्हलच्या पहिल्या वर्षी 'मंगल गाणी' हा कार्यक्रम सादर केला होता. तो कार्यक्रम पुन्हा पुणे फेस्टिव्हलमध्ये सादर करण्याची इच्छा असल्याचेही त्यांनी सांगितले. पुणे फेस्टिव्हलमुळे मराठी कला आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचल्याचे त्यांनी नमूद केले. कार्यक्रमाच्या समारोपावेळी डॉ. सतीश देसाई यांनी पुणे फेस्टिव्हलमधील सांस्कृतिक, नृत्य, कला, क्रीडा, साहित्य आणि कविता अशा विविध कार्यक्रमांना रसिकांनी भरघोस प्रतिसाद द्यावा, असे आवाहन केले.

## कोर्ट परिसरात मुख्य साक्षीदाराचा पाठलाग व कटप्रकरणी आरोपीचा अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळला

■ पुणे (दै. संध्या)

न्यायालयाच्या परिसरात क्रूरकर्मा नानासाहेब गायकवाड मोक्का खटल्यातील महत्त्वाचा साक्षीदार महेश पोपट काटे यांच्यावर पाळत ठेवून त्यांच्या सुरक्षेला धोका निर्माण केल्याच्या आरोपावरून दाखल गुन्ह्यात सोनाली दीपक गवारे हिचा अटकपूर्व जामीन अर्ज पुणे येथील अतिरिक्त सत्र न्यायाधीश एस. आर. पवार यांनी फेटाळला. १६ सप्टेंबर २०२६ रोजी हा आदेश देण्यात आला. या प्रकरणात सरकार पक्षाच्या वतीने ॲड. राजेश कावेडिया, तर मूळ फिर्यादीच्या वतीने ॲड. ऋषिकेश धुमाळ यांनी कामकाज पाहिले.

शिवाजीनगर पोलिस ठाण्यात २० ऑगस्ट २०२६ रोजी एफआयआर क्रमांक २२७/२०२६ दाखल करण्यात आला आहे. भारतीय न्याय संहितेच्या कलम १२६, १३१, १३२, ३५१(१), ३५२ आणि ६१(२) अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला असून, तपासादरम्यान कलम १११चीही भर करण्यात आल्याचे न्यायालयीन आदेशात नमूद आहे. एफआयआरनुसार, ४ ऑगस्ट २०२६ रोजी महेश काटे हे मोक्का खटला क्रमांक २९/२०२२च्या सुनावणीसाठी शिवाजीनगर न्यायालयात सरकारी पोलीस अंगरक्षकासह उपस्थित होते. दुपारी १२ ते ४.३० या वेळेत एक अनोळखी व्यक्ती त्यांचा सातत्याने पाठलाग करून पाळत ठेवत असल्याचा संशय आल्याने त्यांच्या अंगरक्षकाने त्याची चौकशी करण्याचा प्रयत्न केला. या व्यक्तीकडून समाधानकारक माहिती न मिळाल्याने पोलिसांची मदत घेण्यात आली. संबंधित व्यक्तीने आपण दीपक गवारे यांच्या सांगण्यावरून आल्याचे सांगितल्याचा उल्लेख एफआयआरमध्ये आहे. यानंतर शिवाजीनगर पोलिस ठाण्याचे कर्मचारी न्यायालयात दाखल झाले. त्यावेळी सोनाली गवारे तेथे आल्याचे आणि तिने संबंधित व्यक्तीला बेकायदेशीरपणे ताब्यात घेतल्याचा आरोप करत गोंधळ घातल्याचे एफआयआरमध्ये नमूद आहे.

## प्रा. शिंदे यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची पीएच.डी. पदवी प्रदान

■ पुणे (दै. संध्या)



माईर्स एम.आय.टी. संत ज्ञानेश्वर बी.एड. महाविद्यालय, आळंदी (देवाची) येथील शिक्षणशास्त्र विभागाचे सहायक प्राध्यापक संजय पोपट शिंदे यांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवी संपादन केली आहे.

त्यांनी आपले संशोधन शिक्षणशास्त्र (आंतरविद्याशाखा) या विद्याशाखेतून पूर्ण केले असून, त्यांना प्राचार्य डॉ. सुरेंद्र चंद्रकांत हेरकळ यांचे बहुमूल्य मार्गदर्शन लाभले.त्यांच्या संशोधनाचा विषय "Programme Based on Education 4.0 Technology for Developing Technological Skills of Teacher Trainees" (मराठीत आशय: शिक्षक प्रशिक्षणार्थ्यांच्या तांत्रिक कौशल्यांच्या विकासासाठी एज्युकेशन ४.० तंत्रज्ञानावर आधारित कार्यक्रम) असा होता.

शैक्षणिक क्षेत्रासोबतच प्रा. संजय शिंदे हे बालपणापासून प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयाशी जोडलेले आहे.

## गणेशोत्सवात १०० मंडळांनी केली व्यसनमुक्ती जनजागृती चळवळ

■ पुणे : (दै. संध्या)

संयम ठेवा नशेला दूर करा, यशाच्या वाटेवर पुढे चला... स्क्रीनमध्ये हरवू नका, खऱ्या जगापासून दुरावू नका... असा संदेश देणारे फलक यंदाच्या गणेशोत्सवात पुणे आणि परिसरातील तब्बल १०० गणेशोत्सव मंडळांनी लावले आहेत. मंडळाच्या उत्सव मंडपात व आजूबाजूच्या परिसरात हे फलक लावून गणेशोत्सवात व्यसनमुक्तीची चळवळ उभारण्यात आली आहे.

जय गणेश व्यासपीठ, श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट आणि ताराचंद रामनाथ सेवा ट्रस्टच्या सहकार्याने अनोखा उपक्रम राबविण्यात आला आहे. यामध्ये नंदकुमार राठी, सुनील रासने, महेश सूर्यवंशी, शिरीष मोहिते, पियुष शहा यांसह अनेकांनी पुढाकार घेतला.

अमली पदार्थासह मोबाईल व स्क्रीन टाईम देखील वाढत असून याविषयी जनजागृती गरजेची आहे. गणेशोत्सवात विविध राज्यांतून भाविक पुण्यामध्ये येतात. पारंपरिक प्रबोधनपर देखावे यंदा अनेक मंडळांतर्फे साकारण्यात आले आहे. तसेच सजीव देखावे देखील मोठ्या प्रमाणात आहेत. त्यामुळे उत्सव मंडपाच्या दर्शनी भागात याविषयी जनजागृती करणारे फलक मंडळातर्फे लावण्यात आले आहेत.

## नांदेड सिटीतील आरोग्य शिबिरामध्ये ४०० जणांची तपासणी

■ पुणे (दै. संध्या)



गणेश उत्सवानिमित्त नांदेड सिटी रेसिडेन्शिअल डॉक्टर्स असोसिएशन आणि रामराज्य ज्येष्ठ नागरिक संघ, नांदेड सिटी यांच्या संयुक्त विद्यमाने नांदेड सिटी येथील अँफीथिएटर (गणेश मंडप) येथे भव्य निःशुल्क आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराचा नांदेड सिटी, पुणे आणि परिसरातील ४०० हून अधिक नागरिकांनी लाभ घेतला.

शिबिराचे उद्घाटन आमदार भीमराव तापकीर, नगरसेवक काकासाहेब चव्हाण, नगरसेवक सुभाष नाण्हेकर, नांदेड सिटी डॉक्टर्स असोसिएशनचे अध्यक्ष व नेत्रतज्ज्ञ डॉ. अनिल दुधभाते आणि रामराज्य ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष शिरीष पाटील यांच्या उपस्थितीत झाले. यावेळी नांदेड सिटीतील विविध संस्था, सोसायट्या, सामाजिक क्षेत्रातील मान्यवर तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शिबिरात विविध वैद्यकीय शाखांमधील ४० हून अधिक तज्ज्ञ डॉक्टरांनी नागरिकांची तपासणी केली. सामान्य आरोग्य तपासणीसह अस्थिरोग, नेत्ररोग, त्वचारोग, मानसोपचार, स्त्रीरोग, आयुर्वेद, दंतचिकित्सा, होमिओपॅथी, कान-नाक-घसा, बालरोग, फिजिओथेरपी आणि आहारविषयक मार्गदर्शनाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली.

# 'दगडूशेठ' गणपतीच्या निर्माल्यापासून उत्सवात मिळते २ टन खत

■ पुणे (दै. संध्या)

'दगडूशेठ' गणपतीच्या चरणी भक्तीभावाने अर्पण केलेले फुले, हार, नारळ, दुर्वा याच्या निर्माल्यापासून संपूर्ण उत्सवात २ टन खत तयार केले जाते. रोटरी क्लब ऑफ युवा पुणे च्या सहकार्याने हा उपक्रम गेल्या नऊ वर्षांपासून सुरु आहे. शेतकऱ्यांसह सामान्यांना या खताचे मोफत वाटप केले जाते.

श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, सुवर्णयुग तरुण मंडळाच्या वतीने १३४ व्या वर्षी गणेशोत्सव थाटात साजरा होत आहे. त्यामध्ये जमा होणारे निर्माल्य डीपी रस्त्यावरील नवसह्याद्री क्रीडा संकुलाजवळ उभारलेल्या 'निर्माल्य श्रेडिंग प्रकल्पा'त नेण्यात येते. तेथे निर्माल्याची पावडर करून त्याचे सेंद्रिय खत तयार केले जाते आणि ते खत विनामूल्य अन्नदाता शेतकऱ्यासह सामान्यांना देखील दिले जाते.

गणेशोत्सव म्हणजे भक्ती, श्रद्धा आणि उत्साहाचा उत्सव. पण या उत्सवात दरवर्षी मोठ्या प्रमाणावर निर्माल्य जमा होते. या निर्माल्याचे खत करून त्याला नवा अर्थ प्राप्त करून देण्याचे काम दगडूशेठ गणपती ट्रस्ट आणि रोटरी क्लब ऑफ युवा पुणे करीत आहे. हा प्रकल्प ट्रस्टचे अध्यक्ष सुनील रासने, कोषाध्यक्ष महेश सूर्यवंशी यांसह क्लबच्या अध्यक्ष शलाका पाटसकर, सेक्रेटरी श्वेता उंडे, प्रकल्प समन्वयक मनोज धारप यांच्या मार्गदर्शनाखाली सुरु आहे. प्रकल्प समन्वयक मनोज धारप म्हणाले, दररोज सुमारे ४०० किलो निर्माल्यापासून साधारण १५० किलो खत तयार केले जाते. यंदा या प्रकल्पाचे दहावे वर्ष असून मागील नऊ वर्षांपासून दगडूशेठ ट्रस्ट या प्रकल्पाशी जोडला गेला आहे. प्रकल्पात गणेशोत्सवात जमा होणारे निर्माल्य घेऊन येतो आणि त्या निर्माल्यापासून खत तयार करतो. श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती ट्रस्टचे यामध्ये मोठे सहकार्य यामध्ये मिळते. उत्सवात दररोज क्लबतर्फे टेम्पो त्यांच्याकडे पोहोचतो.



दैनिक संध्या | गुरुवार, दि. २४ सप्टेंबर २०२६



# शेतकऱ्यांना जास्तीत जास्त मदत मिळवून देणार – कृषी मंत्री

## पिकांच्या नुकसानीचे पंचनामे तातडीने पूर्ण करण्याचे आदेश

■ पुणे (दै. संध्या)

राज्यात निर्माण झालेल्या दुष्काळसदृश परिस्थितीकडे शासन अतिशय गांभीर्याने पाहत आहे. मा. मुख्यमंत्र्यांनी आजपासूनच पंचनामे करण्याचे आदेश दिले असून, येत्या तीन दिवसांत शेतकऱ्यांच्या मदतीसंदर्भातील पहिली अधिसूचना निघणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी काळजी करण्याचे कारण नाही. कोणत्याही परिस्थितीत शासन शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडणार नाही. झालेल्या नुकसानीसाठी निधीची कमतरता पडू देणार नाही. शेतकऱ्यांना जास्तीत जास्त मदत मिळवून देण्यासाठी शासन कटिबद्ध आहे. तसेच पिण्याचे पाणी आणि जनावरांच्या चाऱ्यासाठीही आवश्यक नियोजन करण्यात आले आहे," असे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी सांगितले.

पुणे जिल्ह्यातील दौंड, बारामती आणि इंदापूर तालुक्यांच्या दौऱ्यावर असताना कृषिमंत्री भरणे यांनी देऊळगाव, मोरगाव, मुर्टी, नावळी आणि कोळविहीरे या गावांना भेट देऊन प्रत्यक्ष शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पिकांची तसेच पाणी परिस्थितीची पाहणी केली. यावेळी आमदार राहुल कुल आणि पुणे जिल्हा परिषदेचे अध्यक्ष वीरधवल जगदाळे उपस्थित होते. कृषी मंत्री भरणे यांनी शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन, पिकाची पाहणी करून पावसातील खंडामुळे खरीप पिकांवर झालेल्या परिणामाची



माहिती घेतली. पुणे जिल्ह्यातील हवेली, जुन्नर, आंबेगाव, मावळ आणि मुळशी या तालुक्यांमध्ये २ ते ३ आठवड्यांचा पावसाचा खंड पडला आहे. भोर व वेल्हा तालुक्यांमध्ये ३ ते ४ आठवड्यांचा पावसाचा खंड असून, ४ आठवड्यांपेक्षा अधिक काळ पावसाचा खंड असलेल्या तालुक्यांमध्ये बारामती, शिरूर, पुरंदर, इंदापूर, दौंड आणि खेड या तालुक्यांचा समावेश असल्याची कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी माहिती दिली. पावसातील दीर्घ खंडामुळे पुणे विभागातील खरीप पिकांवरही परिणाम झाला आहे. या परिस्थितीची केवळ आकडेवारीच्या आधारे पाहणी न करता प्रत्यक्ष क्षेत्रावर जाऊन वस्तुस्थिती जाणून घेणे महत्त्वाचे असल्याचे कृषिमंत्री भरणे यांनी यावेळी सांगितले. मुख्यमंत्र्यांनी आजपासूनच पंचनामे करण्याचे आदेश दिले असून, कृषी व संबंधित विभागांकडून प्रत्यक्ष शेतावर जाऊन नुकसानीची अचूक नोंद करण्यात येत आहे. पावसातील खंड, पिकांची सद्यस्थिती आणि त्याचा पिकांवर झालेला परिणाम लक्षात घेऊन पंचनामे तसेच आवश्यक प्रस्तावांची कार्यवाही तातडीने पूर्ण करण्यात येईल, असा विश्वासही कृषिमंत्री भरणे यांनी व्यक्त केला.

## डिजिटल वापराला चालना; एचडीएफसी बँकेकडून पाच नवे उपक्रम

■ मुंबई (दै. संध्या)

HDFC BANK
We understand your world

भारताच्या सार्वभौम डिजिटल चलनाचा अर्थात सीबीडीसी डिजिटल रुपयाचा दैनंदिन व्यवहार आणि कॉर्पोरेट क्षेत्रातील वापर वाढविण्यासाठी एचडीएफसी बँकेने पाच नवीन उपक्रम सादर केले आहेत. ग्राहक व्यवहार, कर्मचारी भत्ते, पुरस्कार योजना, व्यापारी व्यवहार तसेच विमानातील ऑफलाइन व्यवहार अशा विविध क्षेत्रांत डिजिटल रुपयाचा वापर सुलभ करण्याचा या उपक्रमांचा उद्देश आहे.

बँकेने सादर केलेल्या उपक्रमांमध्ये क्रेडिट कार्ड रिवॉर्ड पॉइंट्सचे डिजिटल रुपयात रूपांतर, ग्राहकांसाठी डिजिटल रुपयातील गिफ्ट व्हाउचर, कर्मचाऱ्यांचे भत्ते व देयके देण्यासाठी कॉर्पोरेट पोर्टल, भीमच्या माध्यमातून डिजिटल रुपयाचा वापर आणि विमानातील व्यवहारांसाठी ऑफलाइन सीबीडीसी सुविधा यांचा समावेश आहे. क्रेडिट कार्डच्या रिवॉर्ड पॉइंट्सचे डिजिटल रुपयातील मूल्यामध्ये रूपांतर करता येणार असल्याने ग्राहकांना भोजन, इंधन, कपडे, इलेक्ट्रॉनिक्स आदी विविध प्रकारच्या व्यवहारांसाठी त्याचा वापर करता येईल. त्याचप्रमाणे प्रचारात्मक योजनांमध्ये डिजिटल रुपयातील गिफ्ट व्हाउचर देण्याची सुविधाही उपलब्ध होणार आहे. कॉर्पोरेट क्षेत्रासाठी डिजिटल रुपयाच्या माध्यमातून कर्मचारी भत्ते, प्रवास व इंधन खर्च यांसारखी देयके देण्याची सुविधा विकसित करण्यात येत आहे. प्रोग्रामेबल पेमेंटमुळे ठरावीक रकमेचा वापर निश्चित उद्देशासाठी करता येणार असून, त्यामुळे संस्थांच्या आर्थिक व्यवस्थापनात अधिक नियंत्रण आणि पारदर्शकता आणण्याचा प्रयत्न आहे. एचडीएफसी बँकेचा डिजिटल रुपया भीमच्या माध्यमातून उपलब्ध करून देण्याची सुविधाही महत्त्वाची ठरणार आहे. त्यामुळे ग्राहकांना परिचित असलेल्या यूपीआय पद्धतीप्रमाणे डिजिटल रुपयातून व्यवहार करता येणे शक्य होईल. याशिवाय, विमान प्रवासादरम्यान इंटरनेट कनेक्टिव्हिटी उपलब्ध नसतानाही खाद्यपदार्थ, पेये किंवा आसन श्रेणीतील बदलांसाठी पैसे देण्याची सुविधा विकसित करण्यात येत आहे. विमानातील एचडीएफसी बँकेच्या पीओएस उपकरणावर फोन टॅप करून व्यवहार करण्याची ही सुविधा डिजिटल रुपयाच्या ऑफलाइन वापराचा विस्तार करणारी ठरणार आहे. एचडीएफसी बँकेचे ग्रुप हेड आशिष पार्थसारथी यांनी डिजिटल रुपयामध्ये प्रोग्रामेबिलिटी, पारदर्शकता आणि नियंत्रण यांचा समावेश असल्याचे नमूद केले. किरकोळ आणि घाऊक व्यवहारांमधील उद्देशाधारित देयके, अनुपालन आणि लेखापरीक्षणासाठी सीबीडीसी उपयुक्त ठरू शकते, असे त्यांनी सांगितले. बँकेचे वरिष्ठ कार्यकारी उपाध्यक्ष रजनीश प्रभू यांनी डिजिटल रुपयाच्या पुढील टप्प्यात त्याचा मोठ्या प्रमाणावर आणि दैनंदिन वापर वाढणे महत्त्वाचे असल्याचे सांगितले. यूपीआय, व्यापारी व्यवहार, रिवॉर्ड योजना, कर्मचारी लाभ आणि ऑफलाइन देयके अशा परिचित माध्यमांशी डिजिटल रुपयाची सांगड घालण्यावर भर असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

> डिजिटल रुपया आणि यूपीआय यांची भूमिका वेगळी असली तरी दोन्ही एकमेकांना पूरक ठरू शकतात. प्रोग्रामेबल पेमेंट, उद्देशाधारित वितरण आणि व्यवहारांवरील अधिक नियंत्रण यांसारख्या सुविधांमुळे डिजिटल रुपयाचा वापर भविष्यात ग्राहकांसोबतच उद्योग आणि संस्थांच्या व्यवहारांमध्येही वाढण्याची शक्यता आहे.

## वनप्लस एन 6 लाइट भारतात लॉन्च

■ नवी दिल्ली (दै. संध्या)

ग्लोबल टेक्नॉलॉजी ब्रँड वनप्लस ने आज वनप्लस एन 6 लाइट भारतात लॉन्च केला आहे. 'पॉवरफुली बिग' या संकल्पनेसोबत आलेल्या या स्मार्टफोनमध्ये आहे प्रचंड ७,००० एमएएच बॅटरी, लीडिंग १२० हर्ट्झ डिस्प्ले, 36-मंथ फ्लुएंसी प्रोटेक्शन आणि मिलिटरी-ग्रेड टिकाऊपणा. प्रभावी किंमत ₹ 16,249* मध्ये वनप्लस एन6 लाइट उपलब्ध आहे दोन आकर्षक रंग पर्यायांमध्ये मिडनाईट हाईप आणि निओ ग्रीन. ओपन सेल आज, 22 सप्टेंबर 2026, दुपारी 12 वाजता आयएसटी पासून सुरू होतो. हा स्मार्टफोन वनप्लस .इन, वनप्लस स्टोअर ॲप, ॲमेझॉन .इन, वनप्लस एक्सपिरियन्स स्टोअर्स आणि भारतभरातील निवडक रिटेल आउटलेट्सवर उपलब्ध आहे. वनप्लस एन 6 लाइट मध्ये प्रचंड ७,००० एमएएच बॅटरी दिली आहे, जी एका चार्जवर तीन दिवसांपर्यंत पॉवर वापर देते. ही बॅटरी वापरकर्त्यांना 26.8 तास व्हिडिओ प्लेबॅक, 29.9 तास गुगल मॅप्स नेव्हिगेशन आणि 55.5 तास फोन कॉलिंगची सुविधा देते. त्यामुळे वापरकर्त्यांना स्ट्रीमिंग, ब्राउझिंग, नेव्हिगेशन आणि कनेक्टेड राहण्यासाठी अधिक वेळ मिळतो. प्रचंड बॅटरीचा पूर्ण उपयोग करण्यासाठी वनप्लस एन 6 लाइट




मध्ये रिव्हर्स चार्जिंग (वायर्ड) सपोर्ट दिला आहे, ज्यामुळे वापरकर्ते इतर डिव्हाइसेसना, त्यात वनप्लस ऑडिओ प्रॉडक्ट्ससुद्धा समाविष्ट आहेत, पॉवर शेअर करू शकतात. दीर्घकालीन विश्वासार्हतेसाठी ही बॅटरी खास डिझाइन केली असून, 1,600 चार्ज सायकल्सच्या चाचणीनंतरही सहा वर्षांनंतर 80% पेक्षा जास्त हेल्थ टिकवते. वनप्लस एन 6 लाइट मध्ये मोठा 6.75-इंच एचडी+ डिस्प्ले दिला आहे, ज्यामध्ये लीडिंग १२० हर्ट्झ रिफ्रेश रेट आहे. यामुळे स्क्रोलिंग अधिक स्मूथ होते आणि इंटरॅक्शन अधिक रेस्पॉन्सिव्ह राहतात. 900 निट्सपर्यंत ब्राइटनेस असल्यामुळे डिस्प्ले घरामध्ये तसेच बाहेरही स्पष्ट दिसतो. याशिवाय, अक्वा टच तंत्रज्ञानामुळे स्क्रीनवर पाणी, ओलावा किंवा तेल असतानाही टच रेस्पॉन्सिव्हनेस कायम राहतो.

## शस्त्रक्रियाविरहित अस्थिरोग उपचारांवर ऑफिसऑर्थोकॉन २६ मध्ये भर

■ पुणे (दै. संध्या)

अस्थिरोगाच्या उपचारांमध्ये शस्त्रक्रिया हाच एकमेव पर्याय नसून, योग्य रुग्णांची निवड आणि शास्त्रीय पद्धतीने केलेल्या शस्त्रक्रियाविरहित उपचारांमुळे अनेक रुग्णांमध्ये शस्त्रक्रिया टाळणे किंवा पुढे ढकलणे शक्य असल्याचे तज्ज्ञांनी स्पष्ट केले आहे. याच दृष्टिकोनातून ऑफिस ऑर्थोपेडिक्स या उपचारपद्धतीला अधिक व्यापक स्वरूप देण्यासाठी पुण्यात 'ऑफिसऑर्थोकॉन २६' या आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. आरोग्यसेवेत अत्याधुनिक तंत्रज्ञान, रोबोटिक प्रणाली, नेव्हिगेशन तंत्रज्ञान आणि कमीत कमी छेदातून होणाऱ्या शस्त्रक्रियांमुळे मोठे बदल झाले आहेत. मात्र त्याचवेळी आधुनिक उपचारांचा वाढता खर्च, अनावश्यक तपासण्या आणि वैद्यकीयदृष्ट्या आवश्यक नसलेल्या शस्त्रक्रियांचा धोका याबाबतही चर्चा होणे आवश्यक असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे. अस्थिरोगशास्त्रातील बाह्यरुग्ण विभागात करता येणाऱ्या शस्त्रक्रियाविरहित उपचारांना 'ऑफिस ऑर्थोपेडिक्स' असे संबोधले जाते. योग्य निदान, औषधोपचार,



पुनर्वसन, इंजेक्शन उपचार, व्यायामाधारित उपचार आणि इतर शस्त्रक्रियाविरहित पर्यायांचा योग्य वापर करून अनेक रुग्णांवर उपचार करता येऊ शकतात. पुण्यातील ज्येष्ठ अस्थिरोगतज्ज्ञ डॉ. एन. जे. कर्णे गेल्या ४१ वर्षांहून अधिक काळ या क्षेत्रात कार्यरत आहेत. गेल्या चार वर्षांपासून ते इंडियन ऑर्थोपेडिक असोसिएशनच्या ऑफिस ऑर्थोपेडिक्स समितीचे अध्यक्ष आहेत. देशातील विविध भागांतील अस्थिरोगतज्ज्ञांकडून शस्त्रक्रियाविरहित उपचारपद्धतींचा प्रभावी वापर होत असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले.

## १० पैकी ७ शहरी भारतीयांना लवकर निवृत्त होण्याची इच्छा

■ पुणे (दै. संध्या)

AXIS MAX LIFE INSURANCE

ॲक्सिस मॅक्स लाईफ इन्शुरन्स लिमिटेड ने आज कांतारच्या भागीदारीत आयोजित केलेल्या आपल्या वार्षिक 'भरोसा टॉक्स इंडिया रिटायरमेंट इंडेक्स स्टडी'(आयरिस ६.०) च्या सहाव्या आवृत्तीचे निष्कर्ष जाहीर केले. या अभ्यासात शहरी भारतात निवृत्तीची कल्पना कशी केली जात आहे यात एक मूलभूत बदल दिसून येतो: भारतीय लोक अधिकाधिक लवकर निवृत्त होऊ इच्छितात आणि लवकर निवृत्तीचा विचार करू लागले आहेत, परंतु इच्छेपासून तयारीपर्यंतचा आर्थिक प्रवास अजूनही दीर्घ आहे. भारताची एकूण निवृत्तीची तयारी यावर्षीही मजबूत राहिली आहे. २०२६ मध्ये भरोसा टॉक्स आयरिस ६.० स्कोअर ४९ होता आणि तो २०२५ मध्ये ४८ आणि २०२२ मध्ये ४४ होता. आर्थिक तयारीचा स्कोअर ५१ वरून किंचित सुधारून ५२ झाला, आरोग्य तयारीचा स्कोअर ४६ वर कायम राहिला, तर भावनिक तयारीचा स्कोअर गेल्या वर्षीच्या ५८ च्या तुलनेत ५७ होता.

भरोसा टॉक्स आयरिस ६.० मध्ये असे आढळून आले आहे की, लोकांच्या आर्थिक गरजा पूर्णपणे भागवल्या गेल्या, तर १० पैकी ७ शहरी भारतीयांना ५८-६० या पारंपरिक सेवानिवृत्तीच्या वयाआधीच निवृत्त व्हायला आवडेल. निवृत्त होण्याची इच्छा असलेल्यांपैकी निम्मे लोक वयाच्या ५० वर्षांपूर्वी आर्थिक स्वातंत्र्य मिळवून लवकर निवृत्त (फायर) होण्याचे ध्येय ठेवतात. तथापि, प्रतिसादकर्त्यांनी त्यांच्या लक्षित सेवानिवृत्ती निधीपैकी सरासरी केवळ २८ टक्के निधी जमा केला आहे. त्यातून सेवानिवृत्तीची महत्त्वाकांक्षा आणि सेवानिवृत्तीसाठीची आर्थिक तयारी यांमधील अंतर दिसते.

महिलांनी भरोसा टॉक्स आयरिस ६.० मध्ये ४९ टक्केवारी नोंदवली आहे. ती पुरुषांच्या बरोबरीची आहे. याला तुलनात्मक आर्थिक, भावनिक आणि आरोग्य सज्जतेचा आधार आहे. ६२ टक्के महिलांना निवृत्तीसाठी आवश्यक असलेल्या निधीची माहिती आहे, ५२ टक्के महिलांनी आरोग्य विमा असल्याचा दावा केला आहे आणि ४१ टक्के महिला सक्रियपणे शारीरिक हालचालींमध्ये सहभागी होतात. शिवाय, ३० टक्के महिलांचा विश्वास आहे की त्यांचा निवृत्ती निधी १० वर्षांपेक्षा जास्त काळ पुरेल. ॲक्सिस मॅक्स लाईफ इन्शुरन्सचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी सुमित मदन म्हणाले, खऱ्या अर्थाने निवृत्तीची तयारी ही व्यक्तींना गरजेपोटी नव्हे, तर त्यांना काम करण्याची इच्छा आहे म्हणून काम करण्यास सक्षम करणारी असावी. दिलासादायक बाब म्हणजे भारतीय तरुण आपला निवृत्तीचा प्रवास खूप लवकर सुरू करत आहेत. त्यातून प्रतिक्रियात्मक नियोजनाकडून सक्रिय तयारीकडे होणाऱ्या स्वागतार्ह बदलाचे संकेत मिळतात.

# व्हॉलीबॉल स्पर्धेत सासवडच्या शिवाजी इंग्लिश स्कूलचे वर्चस्व





■ सासवड (दै. संध्या)

जिल्हा क्रीडा परिषद व जिल्हा क्रीडा अधिकारी तसेच पुरंदर शैक्षणिक संकुल यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजीत तालुकास्तर १४ व १७ तसेच १९ वर्षाखालील वयोगटाच्या शालेय व्हॉलीबॉल स्पर्धा सासवड (ता.पुरंदर) येथील पुरंदर शैक्षणिक संकुलाच्या प्रांगणात सोमवारी आणि मंगळवारी (ता.२१ व २२) पार पडल्या. या स्पर्धेत सासवडच्या शिवाजी इंग्लिश मीडियम स्कूलने यश संपादन केले. नगरसेवक ज्ञानेश्वर जगताप, प्राचार्य इस्माईल सय्यद यांच्या हस्ते आणि महाराष्ट्र राज्य ऑलिम्पिक असोसिएशनचे सहसचिव प्रा. निलेश जगताप, बाळासाहेब झेंडे, तालुका क्रीडा शिक्षक संघाचे प्रल्हाद कारकर, सोमनाथ उबाळे यांच्या नियोजनाखाली स्पर्धा संपन्न झाल्या. याप्रसंगी डीडीएफचे अध्यक्ष किशोर दरेकर, तालुका क्रीडा शिक्षक संघाचे विलास बिचुकले, संतोष गलांडे, उदय बोरावके आदी उपस्थित होते. तालुक्यातील ३५ संघानी यात सहभाग घेतला होता. स्पर्धेचा निकाल पुढीलप्रमाणे : १४ वर्षाखालील मुले: प्रथम : शिवाजी इंग्लिश मीडियम स्कूल सीबीएसई सासवड, द्वितीय: डॉ. पतंगराव कदम विद्यालय दौंडज, तृतीय: निवासी शाळा दिवे. १७ वर्षाखालील मुले: प्रथम: शिवाजी इंग्लिश मीडियम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज सासवड, द्वितीय: शिवाजी इंग्लिश मीडियम स्कूल सीबीएसई सासवड, तृतीय : म. ए. सो. वाघिरे हायस्कूल सासवड. १९ वर्षाखालील मुले: प्रथम: शिवाजी इंग्लिश मीडियम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज सासवड, द्वितीय: जिजामाता हायस्कूल जेजुरी, तृतीय: वाघीरे महाविद्यालय सासवड. १४ वर्षाखालील मुली: प्रथम: शिवाजी इंग्लिश मिडीयम स्कूल सीबीएसई सासवड, द्वितीय: शिवाजी इंग्लिश मिडीयम स्कूल सासवड, तृतीय: डॉ पतंगराव कदम विद्यालय दौंडज. १७ वर्षाखालील मुली: प्रथम: शिवाजी इंग्लिश मिडीयम स्कूल सासवड, द्वितीय: डॉ. शंकरराव कोलते विद्यालय पिसर्वे, तृतीय: महात्मा फुले विद्यालय, शिवरी. शिवाजी इंग्लिश मीडियम स्कूल अँड ज्युनिअर व सीबीएसई च्या सघांचे आणि क्रीडा शिक्षक संतोष गलांडे, उदय बोरावके यांचे संस्थेच्या अध्यक्षा आनंदीकाकी जगताप, सचिव माजी आमदार संजय जगताप, विश्वस्त, समन्वयक सोनाली शिंदे, व्यवस्थापक कानिफनाथ आमराळे, रवींद्रपंत जगताप, प्राचार्य अभिजीत टकले, प्राचार्य अनिल पाटील, उपप्राचार्या सुषमा रासकर यांनी अभिनंदन केले आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे



### कर्मवीर भाऊराव पाटील जयंती साधेपणात साजरी

गोजुबावी : दैनिक संध्या

रयत शिक्षण संस्थेचे न्यू इंग्लिश स्कूल,गोजुबावी, ता.बारामती येथे रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक,थोर शिक्षण प्रसारक कर्मवीर भाऊराव पाटील यांची १३९ वी जयंती साधेपणात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या सुरुवातीस स्वर्गीय अजितदादा पवार यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.त्यानंतर विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सौ.वैशाली बेंडसुरे मॅडम,स्थानिक स्कूल कमिटीचे सदस्य नारायण दादा जाधव,श्री. कल्याणराव आटोळे,श्री.बाबासो गटकळ, श्री.साहेबराव गटकळ,श्री.तानाजी जाधव तसेच माजी विद्यार्थी संघाचे सदस्य यांच्या उपस्थितीत कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी कर्मवीर अण्णांच्या शैक्षणिक कार्याचे व समाजासाठी केलेल्या योगदानाचे स्मरण करण्यात आले.विद्यार्थ्यांनी त्यांच्या विचारांचा आदर्श घेऊन शिक्षणाच्या माध्यमातून प्रगती साधावी,असा संदेश देण्यात आला. स्थानिक स्कूल कमिटी व माजी विद्यार्थी संघाचे सर्व सदस्य यांच्या हस्ते मागील वर्षी AI कोर्स पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले . या प्रसंगी मुख्याध्यापिका,स्कूल कमिटीचे सदस्य,माजी विद्यार्थी संघाचे सदस्य,पालक,शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.कार्यक्रम साधेपणात व उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

### मनीष आणि राहुल यांनी 'खारदुंग ला चॅलेंज २०२६' यशस्वीपणे पूर्ण केले




पुणे : दैनिक संध्या

पुण्यातील 'टीम स्पोर्टिफाय'च्या दोन धावपटूंनी शुक्रवारी, ११ सप्टेंबर २०२६ रोजी लडाखमधील अत्यंत कठीण अशा ७२-किमी 'खारदुंग ला चॅलेंज'ची शर्यत यशस्वीपणे पूर्ण केली. मनीष धामंगे यांनी ही अल्ट्रा मॅराथॉन ११:४६:२५ या प्रभावी वेळेत पूर्ण केली,तर राहुल गुरुंग यांनी १२:०७:४७ मध्ये शर्यत पूर्ण केली.अशा प्रकारे त्यांनी भारतातील सर्वाधिक आव्हानात्मक आणि उंचावरील (हाय-अल्टिट्यूड) सहनशक्तीच्या शर्यतींपैकी एक शर्यत यशस्वीरीत्या पार पाडली. ही शर्यत धावपटूंना लडाखच्या खडतर भूप्रदेशातून,विशेषतः १७,हजार फुटांपेक्षा जास्त उंचीवर असलेल्या प्रसिद्ध 'खारदुंग ला' खिंडीतून घेऊन जाते.प्रचंड उंची,विरळ हवा आणि कठीण भूप्रदेश यामुळे हे आव्हान धावपटूंच्या सहनशक्तीची आणि मानसिक खंबीरपणाची खरी कसोटी पाहणारे ठरते. त्यांचे हे यश म्हणजे प्रशिक्षक विजय बनसोड आणि 'टीम स्पोर्टिफाय'च्या मार्गदर्शनाखाली केलेल्या अनेक महिन्यांच्या समर्पित तयारीचे फळ आहे.या तयारीमध्ये लांब अंतराचे धावणे (long runs),डोंगराळ भागातील प्रशिक्षण (hill training),सहनशक्ती वाढवणारे व्यायाम आणि शर्यतीसाठी विशेष तयारी यांचा समावेश होता. प्रशिक्षक विजय बनसोड म्हणाले,"'खारदुंग ला' ही केवळ ७२-किमीची शर्यत नाही तर ती तयारी,संयम आणि मानसिक खंबीरपणाची कसोटी आहे. मनीष आणि राहुल यांनी प्रशिक्षणादरम्यान प्रचंड निष्ठा आणि जिद्द दाखवली.त्यांचे हे यश 'टीम स्पोर्टिफाय' आणि पुण्यातील धावपटूंच्या समुदायासाठी अभिमानास्पद क्षण आहे."

### भरधाव कंटेनरखाली दुचाकी चिरडली; आयटी अभियंत्याचा जागीच मृत्यू

पुणे : दैनिक संध्या

महंमदवाडी परिसरातील रेहेजा व्हिस्टा येथे भरधाव अवजड कंटेनरने दुचाकीला जोरदार धडक दिल्याने २० वर्षीय आयटी अभियंता हमजा इम्रान सरकार याचा जागीच मृत्यू झाला. त्याच्यासोबत असलेला मित्र गंभीर जखमी झाला. मंगळवारी सायंकाळी सुमारे पाचच्या सुमारास झालेल्या या भीषण अपघातानंतर परिसरात संतापाचे वातावरण निर्माण झाले. हमजा सरकार हा मित्रासोबत दुचाकीवरून जात असताना रेहेजा व्हिस्टा परिसरात भरधाव कंटेनरने त्यांच्या दुचाकीला धडक दिली. धडकेनंतर दुचाकी कंटेनरखाली गेल्याने हमजा गंभीर जखमी झाला. त्याचा घटनास्थळीच मृत्यू झाला. सोबत असलेल्या मित्राला गंभीर दुखापत झाल्याने त्याला उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. या घटनेमुळे परिसरातील नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त झाली. महंमदवाडी परिसरातून अवजड वाहनांची वेगाने होणारी वाहतूक आणि त्यामुळे निर्माण होणारा धोका पुन्हा ऐरणीवर आला आहे. अपघातानंतर नागरिकांनी अवजड वाहनांच्या वाहतुकीवर नियंत्रण ठेवण्याची मागणी केली. घटनेची माहिती मिळताच कोंढवा-काळेपडळ पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी अपघातग्रस्त वाहन ताब्यात घेतले असून संबंधित चालकाला ताब्यात घेतल्याची माहिती आहे. अपघाताची नेमकी कारणे, वाहनाचा वेग आणि चालकाचा निष्काळजीपणा याबाबत पोलीस तपास करीत आहेत. पुण्यातील वाढती अवजड वाहतूक आणि अरुंद रस्त्यांवरील वेगाचा प्रश्न या दुर्घटनेने पुन्हा अधोरेखित केला आहे. निष्पाप दुचाकीस्वाराचा जीव गेल्यानंतरच वाहतूक व्यवस्थेला जाग येणार का, असा सवाल स्थानिकांकडून उपस्थित केला जात आहे.

### ॲडोबी प्रीमियर अँड्रॉईड वर विस्तारले: जलद, शक्तिशाली, सोपे व्हिडिओ एडिटिंग

नवी दिल्ली : दैनिक संध्या




आज अडोबी — क्रिएटिव्हिटी, प्रॉडक्टिव्हिटी आणि पर्सनलाइज्ड कस्टमर एक्स्पिरियन्सेसला सक्षम करणारी जागतिक टेक्नॉलॉजी लीडर — यांनी जाहीर केले की अडोबी प्रीमियर मोबाइल ॲप आता अँड्रॉईड वर उपलब्ध आहे. यामुळे जगभरातील लाखो क्रिएटर्सना सहज आणि शक्तिशाली व्हिडिओ एडिटिंग अनुभव फ्री मध्ये मिळणार आहे. क्रिएटर्ससाठी खास तयार केलेले हे ॲप प्रोफेशनल्स वापरत असलेली एडिटिंग टूल्स मोबाइलवर सहज उपलब्ध करून देते. उच्च-गुणवत्तेचे सोशल कंटेंट सहज तयार करण्यासाठी आवश्यक असलेले सर्व काही आता तुमच्या हातात आहे. "आज आम्हाला आनंद आहे की अडोबी प्रीमियर मोबाइल आता अँड्रॉईड वर फ्री उपलब्ध आहे," असे अडोबी मधील प्रीमियर मोबाइलचे प्रॉडक्ट मार्केटिंग डायरेक्टर दीक्षा कुहर यांनी सांगितले. "भारतामधील 95% क्रिएटर्स आधीच मोबाइल-फर्स्ट आहेत. स्मार्टफोन भारतातील पुढच्या पिढीच्या क्रिएटर्ससाठी स्टुडिओ बनत आहे. iOS सोबतच आता अँड्रॉईड डिव्हाइसवरही प्रीमियर मोबाइल उपलब्ध करून देताना आम्हाला आनंद होत आहे, ज्यामुळे लाखो भारतीय क्रिएटर्सना अडोबी चे प्रो-क्वालिटी व्हिडिओ टूल्स फ्री मध्ये मिळतील."



## थोडक्यात पण महत्वाचे




### मोठ्या थकबाकीदार मालमत्तांवर ३० सप्टेंबरनंतर जप्तीची कारवाई करा : आयुक्त

**पिंपरी : दैनिक संध्या**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीत समावेश असणाऱ्या ज्या मालमत्तांवर मोठ्या प्रमाणात मालमत्ता कराची थकबाकी आहे, अशा मालमत्तांवर ३० सप्टेंबर २०२६ नंतर जप्तीची कारवाई करण्यात यावी, असे निर्देश आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी दिले आहेत. अशी कारवाई प्राधान्याने औद्योगिक, बिगरनिवासी, मिश्र तसेच इतर मालमत्तांवर करण्यात यावी, असे देखील ते म्हणाले. महापालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागाच्या करवसुलीबाबतची आढावा बैठक आयुक्त डॉ. सूर्यवंशी यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडली. यावेळी ते बोलत होते. बैठकीला अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर, उपायुक्त सचिन पवार यांच्यासह सर्व प्रशासन अधिकारी तसेच सहायक मंडलाधिकारी उपस्थित होते. मालमत्ता कर वसुली, मालमत्ता हस्तांतरण, चालू वर्षातील नवीन मालमत्तांची कर आकारणी, थकबाकीदार मालमत्ताधारक तसेच फुगीर मागणी याबाबत विभागनिहाय माहिती बैठकीत घेण्यात आली. करवसुलीचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी प्रलंबित प्रकरणांचा तातडीने निपटारा करून वसुलीची कार्यवाही अधिक गतिमान करण्याच्या सूचना आयुक्त डॉ. सूर्यवंशी यांनी दिल्या. ३० सप्टेंबरनंतर थकबाकीदार मालमत्तांवर जप्तीची प्रक्रिया प्रभावीपणे राबवताना प्राधान्याने मोठ्या प्रमाणात मालमत्ता कर थकीत असलेल्या औद्योगिक, बिगरनिवासी, मिश्र तसेच इतर मालमत्तांवर नियमानुसार जप्तीची कारवाई करावी. थकबाकीदार मालमत्ताधारकांकडून कर वसुलीसाठी आवश्यक ती कायदेशीर कार्यवाही प्रभावीपणे राबवावी, तसेच विभागनिहाय नियोजन करून करवसुलीची कार्यवाही अधिक गतिमान करावी, असे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना आयुक्त डॉ. सूर्यवंशी यांनी दिले आहेत. दरम्यान, शहरातील अनधिकृत बांधकामांवर बारकाईने लक्ष ठेवून नियमानुसार आवश्यक ती कारवाई करण्याच्या सूचना आयुक्तांनी दिल्या. नवीन बांधकामांची माहिती संकलित करून पात्र मालमत्तांची कर आकारणी करण्याची कार्यवाही तातडीने करावी, असेही त्यांनी स्पष्ट केले. महापालिकेच्या उत्पन्नाचा प्रमुख स्रोत असलेल्या मालमत्ता कराची वसुली वाढविण्यासाठी विभागनिहाय नियोजन, थकबाकीदारांचा सातत्याने पाठपुरावा आणि प्रभावी वसुली मोहीम राबविण्यावर बैठकीत भर देण्यात आला. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने मालमत्ता करावर ऑनलाइन कर भरणाऱ्या मालमत्ताधारकांना सामान्य करात ४ टक्के सवलत जाहीर केली आहे.

### वाढदिवसानिमित्त सामाजिक बांधिलकी जपत सचिन काळभोर यांचा अनोखा उपक्रम

**पिंपरी : दैनिक संध्या**

भारतीय जनता पार्टीचे कार्यकर्ते सचिन काळभोर यांच्या वाढदिवसानिमित्त निगडी येथील सिद्धिविनायक गणेश मंदिर परिसरात विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. यावेळी शालेय विद्यार्थी व विद्यार्थिनींना वह्या-पुस्तकांचे वाटप करण्यात आले, तसेच सफाई कर्मचाऱ्यांचा सन्मान करून त्यांना मिठाईचे वाटप करण्यात आले. सामाजिक उत्तरदायित्व जपत आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. वाढदिवस साजरा करण्याबरोबरच समाजोपयोगी कार्य करण्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. सचिन काळभोर यांना वाढदिवसानिमित्त अनेक मान्यवरांनी शुभेच्छा दिल्या. केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे पाटील, केंद्रीय नागरी हवाई वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, राज्यसभा खासदार मेधा कुलकर्णी, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, आमदार अमित गोरखे, मत्स्यव्यवसाय मंत्री नितेश राणे, अनुप संजय धोत्रे, आदी मान्यवरांनी लेखी शुभेच्छापत्र पाठवून त्यांना शुभेच्छा दिल्या. तसेच महापौर रवी लांडगे आणि निगडी परिसरातील अनेक मान्यवरांनी प्रत्यक्ष भेट देत सचिन काळभोर यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. यामध्ये शिवकुमार बायस, राहुल येवले, सुधीर भोसले, पप्पू हतागळे, विकास कांबळे, जयदेव भुवड, सचिन शिंदे, अनिकेत काळभोर, अफसर मुलाणी, राहुल सोनवणे, गणेश बाफना, रवी खैरनार, विशाल उबाळे, प्रवीण पायाळ, प्रसाद फिरोदिया, राजू शेख, रफीक शेख, जावेद शेख, महेबुब शेख, रोहिदास शिवणेकर, संजय बोराडे, सागर बोराडे आणि जगदीश चौधरी यांचा समावेश होता. वाढदिवसानिमित्त आयोजित सामाजिक उपक्रमांमुळे आणि मान्यवरांच्या शुभेच्छांमुळे परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

### भीमशक्तीनगर SRA प्रकल्पाचे फेरसर्वेक्षण करा; उपमुख्यमंत्री पवार यांच्याकडे जाधव यांची मागणी

**पिंपरी : दैनिक संध्या**

मोरेवस्ती, चिखली येथील भीमशक्तीनगर झोपडपट्टी पुनर्वसन (SRA) प्रकल्पातील कथित गैरप्रकारांची चौकशी करून संपूर्ण प्रकल्पाचे बायोमेट्रिक फेरसर्वेक्षण करण्यात यावे, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते मारुती गणपत जाधव यांनी उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्राताई अजितदादा पवार यांच्याकडे केली आहे. याबाबत 21 सप्टेंबर रोजी दिलेल्या निवेदनात जाधव यांनी भीमशक्तीनगर SRA प्रकल्पातील प्राथमिक पात्रता-अपात्रता यादी, संमतीपत्रे आणि सर्वेक्षण प्रक्रियेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित करत शासनाचे लक्ष वेधले आहे. मारूती जाधव यांच्या म्हणण्यानुसार, प्राथमिक सर्वेक्षणानंतर जाहीर करण्यात आलेल्या पात्रता-अपात्रता यादीत अनेक वर्षांपासून वास्तव्यास असलेल्या काही झोपडीधारकांना अपात्र ठरविण्यात आल्याच्या तक्रारी नागरिकांकडून होत आहेत. त्याचबरोबर प्रत्यक्ष स्थानिक रहिवासी नसलेल्या व्यक्तींची किंवा त्यांच्या नातेवाईकांची नावे यादीत समाविष्ट झाल्याचे आरोपही होत असल्याने संपूर्ण यादीची प्रत्यक्ष पडताळणी आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. SRA प्रकल्पासाठी घेण्यात आलेल्या संमतीपत्रांच्या प्रक्रियेबाबतही नागरिकांकडून आक्षेप घेतले जात असल्याचे जाधव यांनी सांगितले. काही नागरिकांवर दबाव टाकून किंवा आर्थिक आमिष दाखवून संमतीपत्रे घेतल्याचे आरोप होत असल्याने संबंधित कागदपत्रांची सखोल चौकशी व्हावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. प्रत्येक संमतीपत्रासोबत संबंधित झोपडीधारकाची ओळख, वास्तव्य, प्रत्यक्ष ताबा तसेच स्वाक्षरी किंवा अंगठ्याची स्वतंत्र पडताळणी करण्यात यावी, असेही त्यांनी सुचविले. भीमशक्तीनगर SRA प्रकल्पाचे SRA प्राधिकरण आणि पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या संयुक्त पथकाद्वारे बायोमेट्रिक फेरसर्वेक्षण करण्यात यावे, अशी प्रमुख मागणी जाधव यांनी केली आहे. या सर्वेक्षणाद्वारे प्रत्यक्ष लाभार्थी, त्यांचे वास्तव्य आणि पात्रता याबाबत अधिक पारदर्शकता निर्माण होईल, असा त्यांचा दावा आहे. फेरसर्वेक्षणादरम्यान प्रत्येक झोपडीधारकाची प्रत्यक्ष उपस्थिती, झोपडीचे अचूक स्थान, उपलब्ध कागदपत्रे, वास्तव्याचा पुरावा तसेच SRA प्रकल्पाला दिलेली संमती किंवा विरोध यांची नोंद करण्यात यावी. संपूर्ण प्रक्रियेचे व्हिडिओ चित्रीकरण केल्यास भविष्यातील वाद आणि गैरसमज टाळता येतील, असेही त्यांनी निवेदनात नमूद केले आहे. याशिवाय, अंतिम आराखडा मंजूर करण्यापूर्वी स्थानिक नागरिकांना पुनर्वसन आराखडा, घरांचे क्षेत्रफळ, इमारतींची संख्या, पुनर्वसनाची जागा आणि उपलब्ध सुविधा यांची स्पष्ट माहिती देण्यात यावी. पात्र झोपडीधारकांचा सहभाग घेऊनच पुढील प्रक्रिया राबवावी.





# भर पावसात हजारो समाजबांधव रस्त्यावर

■ **पिंपरी : (दै. संध्या)**

अनुसूचित जातींच्या आरक्षणातील उपवर्गीकरणाची मागणी तातडीने लागू करण्यासाठी आज नाशिक शहरात राज्यभरातून आलेल्या हजारो समाजबांधवांनी भर पावसात रस्त्यावर उतरून आपली एकजूट आणि ठाम भूमिका व्यक्त केली. प्रतिकूल हवामानाची कोणतीही पर्वा न करता मोठ्या संख्येने समाजबांधव या आंदोलनात सहभागी झाले होते.

आमदार अमित गोरखे यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनातून वंचित आणि उपेक्षित घटकांना त्यांच्या हक्काचा न्याय मिळावा, तसेच आरक्षणाचा लाभ गरजू घटकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचावा, अशी मागणी शासनासमोर मांडण्यात आली.

सर्वोच्च न्यायालयाच्या १ ऑगस्ट २०२४ रोजीच्या निर्णयानुसार अनुसूचित जातींच्या आरक्षणामध्ये उपवर्गीकरण करण्याची घटनात्मक वैधता मान्य करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातही या निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी करून वंचित घटकांना न्याय देण्याची मागणी यावेळी करण्यात आली.येत्या २५ सप्टेंबरपर्यंत राज्य सरकारने अनुसूचित जातींच्या आरक्षण उपवर्गीकरणाबाबत ठोस निर्णय जाहीर केला नाही, तर २९ सप्टेंबर रोजी मुंबईतील आझाद मैदान येथे आयोजित करण्यात येणाऱ्या 'निर्धार मोर्चा'मध्ये राज्यभरातील सर्व समाजबांधवांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले. आरक्षण उपवर्गीकरणाच्या मागणीसाठी सुरू असलेल्या या लोकशाही आणि घटनात्मक लढ्याला अधिक व्यापक स्वरूप देत २९ सप्टेंबरचा निर्धार मोर्चा हा पुढील महत्त्वाचा टप्पा असेल, अशी भूमिका यावेळी व्यक्त करण्यात आली.भर पावसातही हजारोंच्या संख्येने रस्त्यावर उतरलेल्या समाजबांधवांच्या उपस्थितीत सामाजिक न्याय, घटनात्मक हक्क आणि आरक्षण उपवर्गीकरणाच्या मागणीसाठीचा निर्धार अधोरेखित झाला.

## डॉजबॉल स्पर्धेत एच. ए. स्कूलची दमदार कामगिरी



■ **पिंपरी (दै. संध्या)**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका व जिल्हा क्रीडा परिषद, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जिल्हास्तरीय डॉजबॉल स्पर्धेत एच. ए. स्कूल, पिंपरीच्या विद्यार्थिनींनी उल्लेखनीय यश संपादन केले.

या स्पर्धेत १७ वर्षांखालील मुलींच्या गटात एच. ए. स्कूलच्या संघाने प्रथम क्रमांक पटकावत विजेतेपद मिळवले. तसेच १९ वर्षांखालील मुलींच्या गटात तृतीय क्रमांक मिळवून शाळेच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला.या यशाबद्दल शाळेच्या मुख्याध्यापिका दर्शना कोरके तसेच उपमुख्याध्यापक पोपट माने यांनी सर्व खेळाडूंचे अभिनंदन केले. यावेळी त्यांनी विद्यार्थिनींना पुढील स्पर्धांसाठी शुभेच्छा देत अधिक जोमाने सराव करून राज्यस्तरावरही यश मिळवण्याचे आवाहन केले.या सर्व खेळाडूंना शाळेचे क्रीडा शिक्षक मुकेश पवार यांनी मार्गदर्शन केले. त्यांच्या प्रशिक्षणामुळे संघाने उत्कृष्ट सांघिक खेळाचे प्रदर्शन करत ही उल्लेखनीय कामगिरी केली. शाळेच्या या यशामुळे विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

## गणेश विसर्जन मिरवणुकीत डीजेचा दणदणाट

■ **पिंपरी (दै. संध्या)**

गणेश विसर्जन मिरवणुकीदरम्यान ध्वनी प्रदूषण करून सार्वजनिक शांततेचा भंग करणाऱ्या दोन गणेश मंडळांवर शिरगाव-परंदवडी पोलिसांनी कारवाई केली आहे. या प्रकरणी दोन गुन्हे दाखल करण्यात आले असून डीजे साऊंड सिस्टीम, मिक्सर, ॲम्प्लिफायर आणि वाहनासह मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत गणेशोत्सवादरम्यान कायदा व सुव्यवस्था तसेच सार्वजनिक शांतता अबाधित राहावी यासाठी उच्च क्षमतेचे डीजे, डॉल्बी साऊंड सिस्टीम आणि ध्वनी प्रदूषण करणाऱ्या साधनांच्या वापरावर बंदी घालण्यात आली आहे. याबाबत सर्व गणेश मंडळांचे अध्यक्ष, पदाधिकारी तसेच डीजे चालक व मालकांची बैठक घेऊन नियमांचे पालन करण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या.

तरीही दि.२० सप्टेंबर रोजी सातव्या दिवसाच्या गणेश विसर्जन मिरवणुकीदरम्यान शिरगाव-परंदवडी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील चांदखेड येथील जय महाराष्ट्र मित्र मंडळ आणि ओहार्डे येथील शिवतेज मित्र मंडळ यांनी निर्धारित मर्यादेपेक्षा जास्त आवाजात ध्वनीक्षेपक यंत्रणा वाजवल्याचे आढळून आले.

त्यामुळे दोन्ही मंडळांविरुद्ध भारतीय न्याय संहिता तसेच महाराष्ट्र पोलीस कायद्यान्वये गुन्हे दाखल करण्यात आले. या कारवाईत ८ डीजे साऊंड सिस्टीम स्पीकर, २ डीजे मिक्सर, २ ॲम्प्लिफायर मशीन आणि १ वाहन जप्त करण्यात आले आहे.

## वायसीएममधील औषधटंचाई तातडीने दूर करा : जगताप

■ **पिंपरी (दै. संध्या)**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयात (वायसीएम) उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांना डॉक्टरांनी लिहून दिलेली आवश्यक औषधे रुग्णालयाच्या औषध वितरण केंद्रात उपलब्ध होत नसल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत. औषधांची ही कमतरता तातडीने दूर करून रुग्णांना सर्व आवश्यक औषधे उपलब्ध करून द्यावीत, अशी मागणी भाजपचे नगरसेवक ज्ञानेश्वर ऊर्फ माऊली जगताप यांनी केली आहे.

याबाबत माऊली जगताप यांनी मंगळवारी (दि.२२) महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, वायसीएमचे अधिष्ठाता राजेंद्र वाबळे यांना निवेदन दिले. वायसीएम रुग्णालयात शहरासह आसपासच्या परिसरातील हजारो सर्वसामान्य, गरीब आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्ण उपचारांसाठी येतात. मात्र, डॉक्टरांनी लिहून दिलेली अनेक औषधे वितरण केंद्रात मिळत नसल्याने रुग्णांना खासगी औषध विक्रेत्यांकडून महागड्या दराने ती खरेदी करावी लागत असल्याचे निवेदनात म्हटले आहे. आर्थिक परिस्थिती कमकुवत असलेल्या रुग्णांना बाहेरून औषधे खरेदी करणे शक्य होत नाही. त्यामुळे त्यांच्या उपचारांमध्ये खंड पडून आरोग्याला धोका निर्माण होण्याची शक्यता आहे. औषधांच्या कमतरतेमुळे कोणत्याही रुग्णाचा उपचार थांबू नये किंवा रुग्णाच्या जीविताला धोका निर्माण होऊ नये.

## गवारे मृत्यू प्रकरणात घटनास्थळी रिक्रिएशन

### वाकड पोलिसांनी घेतली आरोपींकडून घटनाक्रमाची माहिती

■ **पिंपरी (दै. संध्या)**




वाकड येथील शिल्पा गवारे मृत्यू प्रकरणाच्या तपासाला गती देत वाकड पोलिसांनी घटनास्थळी रिक्रिएशन (घटनाक्रमाची पुनर्रचना) केले. या प्रकरणात अटकेत असलेले शिल्पा गवारे यांचे पती सचिन गवारे, सासू संजीवनी गवारे, सासरे उत्तम गवारे आणि दीर यांच्याकडून आत्महत्येच्या दिवशी तसेच त्यापूर्वी घडलेल्या घटनांची सविस्तर माहिती घेण्यात आली.

शिल्पा गवारे यांनी सासरच्या घरी मध्यरात्री सुमारे एक वाजण्याच्या सुमारास आत्महत्या केल्याचे समोर आले होते. मात्र, त्यावेळी बेडरूमचे दार उघडे असल्याचा मुद्दा उपस्थित करत शिल्पा यांच्या माहेरच्या कलाटे कुटुंबीयांनी हा मृत्यू आत्महत्या नसून हत्या असल्याचा संशय व्यक्त केला आहे. त्यानुसार पोलिसांकडून सर्व बाजूंनी तपास सुरू आहे.

तपासाचा भाग म्हणून आज पोलिसांनी आरोपींकडून त्या रात्रीचा संपूर्ण घटनाक्रम जाणून घेत घटनास्थळी प्रत्यक्ष रिक्रिएशन केले. आत्महत्येपूर्वी घरात नेमक्या कोणत्या घटना घडल्या, कोण कुठे उपस्थित होते आणि परिस्थिती कशी निर्माण झाली, याबाबत आरोपींकडून माहिती घेण्यात आली.

या रिक्रिएशनदरम्यान वैद्यकीय तज्ज्ञांचे पथकही पोलिसांसोबत उपस्थित होते. घटनास्थळावरील परिस्थिती, उपलब्ध पुरावे आणि आरोपींच्या जबाबांची पडताळणी करण्याच्या दृष्टीने हे रिक्रिएशन महत्त्वाचे मानले जात आहे. या प्रक्रियेतून तपासासाठी उपयुक्त माहिती समोर येण्याची शक्यता असून शिल्पा गवारे यांच्या मृत्यूमागील नेमकी परिस्थिती काय होती, याचा सखोल तपास वाकड पोलीस करत आहेत.

# प्रभारी उपशिक्षणाधिकारी पदाचा कार्यभार तात्काळ रद्द करा : नढे

■ **पिंपरी (दै. संध्या)**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या माध्यमिक शिक्षण विभागातील प्रशासकीय कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित करत माजी विरोधी पक्षनेते तथा नगरसेवक विनोद नढे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे तक्रार केली आहे. फौजदारी खटला, विभागीय चौकशी आणि परिविक्षाधीन कालावधी प्रलंबित असताना मुख्याध्यापक बाबासाहेब अंबादास राठोड यांच्याकडे प्रभारी उपशिक्षणाधिकारी पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आल्याचा आरोप नढे यांनी केला आहे.

विनोद नढे यांनी मुख्यमंत्र्यांना दिलेल्या निवेदनात या नियुक्तीची चौकशी करून संबंधित अतिरिक्त कार्यभार तात्काळ रद्द करण्याची मागणी केली आहे.

विदनानुसार, लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या प्रकरणात राठोड यांचे निलंबन रद्द करताना महापालिका आयुक्तांच्या २७ मे २०१९ रोजीच्या आदेशातील काही अटींनुसार त्यांना आर्थिक स्वरूपाशी संबंधित किंवा जनसंपर्क असलेले काम न देता केवळ अध्यापनाचे अकार्यकारी कामकाज देण्याचे निर्देश होते. असे असताना त्यांच्याकडे उपशिक्षणाधिकारी पदाचा प्रशासकीय व आर्थिक अधिकार असलेला अतिरिक्त कार्यभार कसा सोपविण्यात आला, असा सवाल नढे यांनी उपस्थित केला आहे. तसेच, २८ नोव्हेंबर २०२२ च्या महापालिका आदेशानुसार एसीबी प्रकरण न्यायालयात प्रलंबित असल्याने राठोड यांचा मुख्याध्यापक पदावरील परिविक्षाधीन कालावधी अद्याप मंजूर झालेला नसल्याचा दावा निवेदनात करण्यात आला आहे. विभागीय चौकशी आणि शासनाच्या संबंधित परिपत्रकांचेही उल्लंघन झाल्याचा आरोप नढे यांनी केला आहे. प्रभारी पद देताना सेवाज्येष्ठतेचा विचार करण्यात आलेला नसल्याचे सांगत नढे यांनी 'कॅच-अप' नियम तसेच शासनाच्या ७ मे २०२१ रोजीच्या निर्णयाकडे दुर्लक्ष झाल्याचा आरोप केला आहे. माध्यमिक शिक्षण विभागात सेवाज्येष्ठ व निष्कलंक मुख्याध्यापक उपलब्ध असताना त्यांना डावलून राठोड यांना अतिरिक्त कार्यभार देण्यात आल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.






## थोडक्यात पण महत्वाचे



## रयतचे संस्थापक कर्मवीर भाऊराव पाटील जयंती विविध उपक्रमांनी साजरी

**कवठे येमाई : दैनिक संध्या**

कवठे येमाई ता.शिरूर येथील न्यू इंग्लिश स्कूल,जुनिअर कॉलेज व ग्रामस्थांच्या वतीने रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक शिक्षणमहर्षी, पद्मभूषण कर्मवीर भाऊराव पाटील यांची जयंती विविध उपक्रमांनी उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी कर्मवीर अण्णांच्या प्रतिमेचे व पुतळ्याचे पूजन करून त्यांना अभिवादन करण्यात आले. पारंपरिक पद्धतीने सजवलेल्या ट्रॅक्टरमध्ये कर्मवीर अण्णांची प्रतिमा ठेवण्यात आली. विद्यालयातील विद्यार्थिनींच्या लेझीम पथकाने, झांज पथकाने तसेच घोष पथकाने संपूर्ण गावातून मिरवणूक काढली. 'कर्मवीर अण्णांचा विजय असो', 'कमवा व शिका' अशा घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. सकाळी शाळेच्या प्रांगणात पंचायत समिती सदस्य कांचनताई सांडभोर यांच्या हस्ते कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर गावातील प्रमुख मार्गावरून मिरवणूक काढण्यात आली. ग्रामस्थ, नागरिक तसेच माजी विद्यार्थ्यांनी ठिकठिकाणी पुष्पवृष्टी करून कर्मवीर अण्णांना अभिवादन केले. २० सप्टेंबर १८८७ रोजी कोल्हापूर जिल्ह्यातील कुंभोज येथे जन्मलेल्या भाऊराव पाटील यांनी बहुजन समाजातील मुलांना शिक्षण मिळावे, यासाठी १९१९ मध्ये रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली. 'शिक्षणातून समाज परिवर्तन' हा विचार घेऊन त्यांनी काम केले. गरीब व वंचित विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी मिळावी यासाठी त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य शिक्षणकार्याला वाहिले. त्यांच्या कार्याची दखल घेत भारत सरकारने त्यांना १९५९ साली पद्मभूषण पुरस्काराने गौरविले.मिरवणुकीच्या यशस्वी नियोजनासाठी विद्यालयाचे प्राचार्य शिवराम मुंजावडे यांच्या मार्गदर्शनाखाली महेंद्र देवडे, शरद वाघ,संतोष सोनवणे, सदाशिव दामसे, करंजकर योगेश गायकवाड,आदी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.कार्यक्रमास विद्यार्थी, पालक, माजी विद्यार्थी व ग्रामस्थ उपस्थित होते.



## आवक घटल्यामुळे डाळिंबाचे भाव कडाडले

**नारायणगाव: दैनिक संध्या**


आळेफाटा बाजार समितीत सोमवार दि.२१ सप्टेंबर रोजी डाळींबाच्या २० किलोच्या एका क्रेटला ६ हजार रुपयांचा भाव मिळाला आहे.देशांतर्गत बाजारात डाळिंबाची आवक घटल्यामुळे हे नवे दर गगनाला भिडले आहेत. हवामानातील अनपेक्षित बदल, अवकाळी पाऊस आणि विविध रोगांच्या वाढत्या प्रादुर्भावामुळे यंदा देशभरात डाळिंबाच्या उत्पादनात प्रचंड घट झाली आहे. याचा थेट परिणाम बाजारातील आवकेवर झाला आहे. सध्या सोलापूर, नाशिक, अहमदनगरसह राज्यातील प्रमुख डाळिंब उत्पादक पट्ट्यांमध्ये नवीन बहराची आवक मंदावली आहे. तसेच राजस्थान आणि कर्नाटकातून होणारी आवकही घटल्याने देशभरातील प्रमुख व्यापाऱ्यांचे लक्ष जुन्नर परिसरातील आवकेवर केंद्रित झाले आहे. जुन्नर कृषी उत्पन्न बाजार समितीत असणाऱ्या आळेफाटा येथील उपबाजारात सोमवारी झालेल्या बाजार लिलावात २० किलोच्या एका क्रेटला ६ हजार रुपयांचा भाव मिळाला आहे. त्या खालोखाल त्याच्या दुसऱ्या डाळिंबाच्या एका क्रेटला ४ हजार रुपयांचा भाव मिळाला आहे. तर तिस-या क्रमांकाच्या डाळींबाच्या एका क्रेट ला ३ हजार रुपयांचा भाव मिळाला व चार नंबर क्रमांकाच्या एका क्रेट ला १ हजार ५०० रुपयांचा बाजारभाव मिळाला. तसेच बाजार समितीत सुमारे १ हजार ५०० क्रेट ची आवक झालेली होती. गेल्या काही दिवसांपासून हे दर स्थिर असून, आवक अशीच मर्यादित राहिल्यास दरांमध्ये आणखी वाढ होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

## जुन्नर तालुक्यातील शिक्षकांचा सन्मान

**नारायणगाव: दैनिक संध्या**

जुन्नर तालुका माध्यमिक शिक्षक संघ, जुन्नर तालुका TDF, जुन्नर तालुका माध्यमिक शिक्षिका संघ आणि जुन्नर तालुका सेवानिवृत्त माध्यमिक शिक्षक संघ यांच्या संयुक्त विद्यमाने तालुक्यातील गुणवंत शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा भव्य सत्कार सोहळा नुकताच संपन्न झाला. या सोहळ्यात आयोजित कार्यक्रमात तालुक्यातील २९ मुख्याध्यापक, उपशिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना त्यांच्या उत्कृष्ट सेवेबद्दल "गुणवंत शिक्षक पुरस्कार" देऊन सन्मानित करण्यात आले. या शानदार सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी अखिल महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संयुक्त महामंडळाचे अध्यक्ष के. एस. ढोमसे होते. त्यांच्या प्रमुख उपस्थितीने कार्यक्रमाची शोभा अधिकच वाढली. कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून जुन्नर तालुक्याचे आमदार शरद सोनवणे, महाराष्ट्र ओळखचे अध्यक्ष जी. के. थोरात, जिल्हा परिषद सदस्या छाया तांबे, उल्का मोरे,सचिव के. एस. ढोमसे व पंचायत समिती सदस्य प्रशांत डुंबरे यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सर्व पुरस्कारप्राप्त शिक्षकांना सन्मानचिन्ह व सन्मानपत्र देऊन अत्यंत उत्साही वातावरणात गौरविण्यात आले. या सोहळ्यात बोलताना पुणे जिल्हा माध्यमिक शिक्षक संघाचे अध्यक्ष पंकज घोलप, के. एस. ढोमसे, जी.के थोरात व सखाराम पुंडे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. त्यांनी शिक्षकांच्या समाजातील योगदानाचा गौरव केला आणि भावी पिढी घडवण्यामध्ये शिक्षकांची भूमिका किती महत्त्वाची असते, यावर प्रकाश टाकला. या सोहळ्यात संजय बाळशिराम कालेकर, किसन संभाजी यादव, प्रशांत बबन पादिर ,प्रकाश बबन दाते ,कविता मारुती साबळे, रामचंद्र सुब्रमणियमम अय्यर, हेमलता बाळासाहेब यादव, आशिष भागुजी कोल्हे, गणेश वासुदेव जाधव, महेंद्र किसन तोडकर, सोपान रामदास वामन, विठ्ठल तुकाराम भुजबळ, अमोल दत्तात्रय थोरात, प्रमोदकुमार मारुती जाधव, सुवर्णा संदीप नांगरे, प्रदीपकुमार वसंतराव मिरगे, गंगाधर बाबुराव सहाणे, सारिका नामदेव हिंगणे, बेबी हिरामण शिंगोटे,सुधीर बापूसाहेब हांडे, श्रद्धा मच्छिंद्रनाथ म्हेत्रे, सुनील किसन बडे, जगन्नाथ बबन सोनवणे, दशरथ लक्ष्मण देवाडे, कुंदा गणेश विटे, प्रिया मेमन, आदिनाथ बाबुराव लाड, सखाराम जनार्दन पुंडे आणि वैशाली तुषार आहेर या २९ गुणवंतांचा सन्मान करण्यात आला. या कौतुकास्पद सोहळ्याला मुरलीधर मांजरे, संजय बाठे, सिताराम गवळी, अशोक काकडे, निलेश काशीद, गणेश राऊत, प्रदीप गाढवे आणि इतर अनेक शिक्षक व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जेजुरीत महारुद्र मंडळाच्या वतीने रक्तदान शिबीर संपन्न



■ **जेजुरी (दै. संध्या)**

महाराष्ट्राचे कुलदैवत असणाऱ्या खंडोबा देवाच्या जेजुरी नगरीत सार्वजनिक उत्सवाची धामधूम शिगेला पोहचली असून विद्यानगर येथील श्री दत्त मित्र मंडळ ट्रस्ट वतीने जेजुरी फेस्टिवल व जेजुरी जत्रेचे आयोजन तसेच शौर्य मंडळाने लहान मुलांसाठी पाळणे, तसेच जुनी जेजुरी येथील महारुद्र मंडळाच्या वतीने रक्तदान शिबीराचे आयोजन केले होते.

जेजुरी शहरात 50 सार्वजनिक मंडळांनी श्री गणेशाची प्रतिष्ठापना केली असून यातील 10 मंडळांनी विविध उपक्रम राबविले आहेत. जेजुरी विद्यानगर परिसरातील श्री दत्त मंडळाने दरवर्षी प्रमाणे विविध उपक्रम सुरू केले असून तीन दिवस फेस्टिवल, खाद्य पदार्थाचे स्टॉल, मुलांसाठी पाळणे, विविध खेळणी,जेजुरी जत्रेचे आयोजन केले होते. या जत्रेत तीन हजार मुलांनी सहभाग घेतला होता. या मंडळाचे अध्यक्ष लिंगेश नारायणपूरकर व कार्यकर्त्यांनी या उपक्रमाचे नियोजन केले.तर शौर्य मंडळाने सुंदर मंदिराचा देखावा व मुलांसाठी पाळणे व खेळण्याचे साधने ठेवली होती.मंडळाचे अध्यक्ष गणेश भोसले व मित्र परिवाराने या कार्यक्रमाचे नियोजन केले आहे.

जुनी जेजुरी येथील महारुद्र मंडळाचे रक्तदान शिबीराचे आयोजन केले. 259 तरुणांनी या शिबिरात रक्तदान केले. महिलांसाठी खेळ पैठणीचा, रांगोळी, चित्रकला स्पर्धा, फनी गेम्सचे आयोजन मंडळाचे अध्यक्ष विक्रम शिंदे यांनी केले आहे.

अहिल्यादेवी मित्र मंडळाने गुहेतील भूत बंगला सादर केला असून नागरिकांनी रांगा लावून हा देखावा पहिला. या मंडळाचे अध्यक्ष सचिन लोणकर यांनी या देखाव्याचे नियोजन केले.मानाचा गणपती असणारा हनुमान तालीम मंडळ, जननी मित्र मंडळाचे वतीने गणपती अथर्वशीर्ष, प्रवचन, धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे . इतर सार्वजनिक मंडळांनी भजन,कीर्तन, प्रवचन व धार्मिक उपक्रमावर भर दिला आहे

## डेंग्यू व मलेरियाच्या पार्श्वभूमीवर प्राथमिक आरोग्य केंद्राच्या पथकाची गावठाणात धाव

■ **कवठे यमाई (दै. संध्या)**

शिरूर तालुक्याच्या पश्चिमेकडील कवठे येमाई गावात डासांची उत्पत्ती वाढत असताना डेंग्यू व मलेरियासारख्या डासजन्य आजारांचा संभाव्य धोका लक्षात घेऊन कवठे यमाई प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वतीने आज सकाळपासून गावठाण परिसरात प्रतिबंधात्मक तपासणी, जनजागृती व दक्षता मोहीम सुरू करण्यात आली.आरोग्य विभागाच्या पथकाने प्रत्यक्ष नागरिकांशी संवाद साधत डासांची उत्पत्ती रोखण्यासाठी आवश्यक उपाययोजनांची माहिती दिल्याने ग्रामस्थांमध्ये समाधान व्यक्त होत आहे.



या मोहिमेत प्राथमिक आरोग्य केंद्रातील आरोग्य सेवक विनायकराव गोसावी,आरोग्य सेवक अमोल जाधव,आशा वर्कर प्रगती कांदळकर,आशा वर्कर अर्चना उघडे यांच्यासह आरोग्य विभागाच्या पथकाने सहभाग घेतला. घराभोवती तसेच परिसरात पाणी साचू न देणे, पाण्याची भांडी झाकून ठेवणे, डासांची उत्पत्तीस्थाने नष्ट करणे आणि तापाची लक्षणे आढळल्यास तातडीने प्राथमिक आरोग्य केंद्राशी संपर्क साधणे याबाबत नागरिकांना मार्गदर्शन करण्यात आले.

दरम्यान, गावात डासांची उत्पत्ती वाढत असल्याच्या पार्श्वभूमीवर डास प्रतिबंधक फवारणी तसेच नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजना करण्याबाबत मागील जुलै महिन्यातच ग्रामपंचायतीला निवेदन देण्यात आल आहे, अशी माहिती आरोग्य सेवक विनायकराव गोसावी यांनी दिली.

मात्र, संबंधित निवेदनांनंतरही ग्रामपंचायतीकडून अद्याप ठोस कारवाई झालेली नसल्याने अनेक ग्रामस्थांनी नाराजी व्यक्त केली आहे. डासांची वाढती उत्पत्ती आणि डेंग्यू-मलेरियाचा संभाव्य धोका लक्षात घेता गावठाण परिसरात तातडीने डास प्रतिबंधक फवारणी करून स्वच्छता व आरोग्यविषयक उपाययोजना करण्याची मागणी ग्रामस्थांकडून होत आहे. या बाबत ग्रामविकास अधिकारी पूनम थोरात चितळकर यांना थेट संपर्क साधला असता ग्रामपंचायतीच्या माध्यमातून शक्य होईल त्या डास प्रतिबंधात्मक उपाय योजना तातडीने करू असे आश्वासन दिले आहे.आरोग्य विभागाने प्रतिबंधात्मक उपाययोजनांसाठी पुढाकार घेतला असला तरी डासांची उत्पत्ती रोखण्यासाठी ग्रामपंचायत, आरोग्य विभाग आणि नागरिक यांचा समन्वय आवश्यक आहे.

## महिला शेतकऱ्यांना स्वतंत्र ओळख

### प्रमाणपत्रासाठी १.०५ लाख अर्ज

■ **बारामती (दै. संध्या)**

शेती आणि शेतीपूरक व्यवसायात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या महिला शेतकऱ्यांना स्वतंत्र अधिकृत ओळख देण्यात येणार आहे. त्यासाठी महिला शेतकरी प्रमाणपत्राचा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. या प्रमाणपत्रासाठी राज्यातून आत्तापर्यंत एक लाख पाच हजार ४१६ अर्ज कृषी विभागाकडे आले आहेत. महिला शेतकऱ्यांना विविध शासकीय योजनांचा स्वतंत्रपणे लाभ मिळावा, हा त्यामागचा उद्देश आहे. कृषी सेवा, कर्ज, विमा आणि अन्य योजनांसाठी त्यांची अधिकृत नोंदही या माध्यमातून होणार आहे. महिला शेतकऱ्यांना केवळ शेतीतील योगदानापुरते मर्यादित न ठेवता शासकीय योजनांमध्ये स्वतंत्र लाभार्थी म्हणून अधिकृत मान्यता देण्यासाठी राज्य सरकारने 'महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण अधिनियम, २०२६' अंतर्गत प्रमाणपत्र देण्याचा उपक्रम हाती घेतला आहे.



यामध्ये यवतमाळ जिल्ह्यात सर्वाधिक नऊ हजार ८९७ अर्ज आले असून, छत्रपती संभाजीनगर सात हजार ६४४, बुलडाणा सहा हजार १७६, नाशिक पाच हजार ९०९ आणि जालना पाच हजार ४३१ या जिल्ह्यांचा त्यापाठोपाठ क्रमांक आहे. पुणे जिल्ह्यात तीन हजार ६८७ अर्ज दाखल झाले आहेत. सर्वात कमी अर्ज सिंधुदुर्ग जिल्ह्यात दाखल झाले असून त्यांची संख्या ८३३ आहे. त्यापाठोपाठ रत्नागिरीत ९३९, सांगलीत एक हजार १७८, भंडाऱ्यात एक हजार १८२ आणि कोल्हापुरात एक हजार २२१ अर्ज दाखल झाले आहेत.

## नारायणगावात 'जयंती २' हाउसफुल्ल; मोफत शोला प्रेक्षकांचा उदंड प्रतिसाद

■ **नारायणगाव (दै. संध्या)**

सध्याच्या शिक्षण व्यवस्थेतील वास्तव आणि सामाजिक विषमतेवर भाष्य करणारा बहुचर्चित मराठी चित्रपट 'जयंती २' नारायणगाव येथील लक्ष्मी सिने पॅलेस येथे हाउसफुल्ल झाला. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रतिष्ठानचे अध्यक्ष गणेश बिंबाजी वाव्हळ, सामाजिक कार्यकर्ते गणेश जनार्दन वाव्हळ,गिरीराज वाव्हळ आणि ग्रामपंचायत माजी सदस्य बाळा वाव्हळ यांच्या माध्यमातून हा चित्रपट सर्वांसाठी मोफत दाखविण्यात आला.



या चित्रपटात एका आदिवासी विद्यार्थिनीचा पुण्यातील महाविद्यालयातील संघर्ष, तिच्यावर होणारा संस्थात्मक अन्याय आणि तिच्या न्यायासाठी लढणारे कार्यकर्ते यावर अत्यंत धाडसी आणि संवेदनशील भाष्य करण्यात आले आहे. अभिनेते ऋतुराज वानखेडे, पायल जाधव आणि संपूर्ण कलाकारांचा अभिनय अप्रतिम असून दिग्दर्शक शैलेश नरवाडे यांनी हा विषय अत्यंत परिणामकारकपणे पडद्यावर मांडला आहे. यावेळी बोलताना आयोजकांनी सांगितले की, "आरक्षण हा आपला हक्क आहे. हा सिनेमा केवळ करमणूक म्हणून न पाहता आपले हक्क आणि अधिकार मिळवण्याचे साधन म्हणून पाहिला पाहिजे. आज आरक्षणामुळे पद मिळत असले तरी जातिभेद संपलेला नसल्याने अधिकार वापरता येत नाही. हा सिनेमा समता, स्वातंत्र्य, बंधुता या शाहू फुले, आंबेडकर यांच्या विचारांवर आधारित असून सर्वांनी अभ्यास म्हणून पहावा.

## 'आविष्कार' स्पर्धेत जिजामाता वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग

■ **कोरेगावमुळ(दै. संध्या)**



श्री गुरुदत्त ग्रामविकास प्रतिष्ठान संचलित जिजामाता वरिष्ठ महाविद्यालयात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या 'आविष्कार' स्पर्धेचे आयोजन उत्साहात करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये संशोधनाची आवड निर्माण करणे, सर्जनशील व नाविन्यपूर्ण विचारांना चालना देणे, चिकित्सक दृष्टिकोन विकसित करणे तसेच दैनंदिन समस्यांवर उपाय शोधण्याची क्षमता वाढविणे हा या स्पर्धेचा प्रमुख उद्देश होता.

या स्पर्धेत महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. वाणिज्य विभागातील विद्यार्थ्यांनी वित्तीय व आर्थिक विषयांशी संबंधित विविध प्रकल्प सादर केले. आर्थिक व्यवहार, वित्तीय व्यवस्थापन आणि त्यांची व्यावहारिक उपयुक्तता यांचा विद्यार्थ्यांनी अभ्यासपूर्ण पद्धतीने वेध घेतला. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकीय ज्ञानासोबतच संशोधनात्मक व व्यावहारिक दृष्टिकोन विकसित करण्याची संधी मिळाली. यावेळी प्राचार्य डॉ. शिवाजी बोऱ्हाडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. 'आविष्कार'सारख्या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला आणि संशोधनवृत्तीला चालना मिळते असे त्यांनी सांगितले. विद्यार्थ्यांनी आपल्या परिसरातील सामाजिक, आर्थिक तसेच दैनंदिन जीवनातील समस्यांचा अभ्यास करून त्यावर नाविन्यपूर्ण उपाय शोधण्याचा प्रयत्न करावा असे आवाहन त्यांनी केले.

संशोधनात्मक दृष्टिकोनातून विद्यार्थ्यांचा शैक्षणिक विकास होण्याबरोबरच समाजाच्या प्रगतीलाही हातभार लागतो असे त्यांनी नमूद केले. स्पर्धेत सृष्टी राऊत हिने प्रथम, सेजल पटेल हिने द्वितीय तर मानसी कामठे हिने तृतीय क्रमांक पटकावला. यशस्वी विद्यार्थिनींचे संस्थेचे अध्यक्ष कांतीलाल उमाप, उपाध्यक्ष सुगंधराव उमाप, सचिव प्रकाश पवार तसेच संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी अभिनंदन केले.

# श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाच्या गणरायाचे विसर्जन

■ **सासवड : (दै. संध्या)**

सासवड येथील श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाच्या शिवाजी इंग्लिश मीडियम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज आणि गुरुकुल विद्यालयाच्या लाडक्या गणरायाचे सातव्या दिवशी अत्यंत उत्साहात आणि भव्य मिरवणुकीने विसर्जन करण्यात आले. बाप्पाच्या या निरोप सोहळ्याने संपूर्ण सासवड नगरीत भक्तिमय व आनंददायी वातावरण तयार केले होते.

यंदाच्या गणेशोत्सवात शिवाजी इंग्लिश मीडियम स्कूलने संपूर्ण शहराचे लक्ष वेधून घेत 'अन्नसुरक्षा व निरोगी जीवन' ही अत्यंत महत्त्वाची आणि समाजप्रबोधन करणारी संकल्पना राबवली. याद्वारे विद्यार्थ्यांनी केवळ धार्मिक उत्सव न साजरा करता आरोग्यदायी जीवनशैली आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत उपस्थितांना विचार करायला लावले.

या गणेशोत्सवाच्या विसर्जननिमित्त विद्यालयाच्या वतीने लाडक्या गणरायाला भावपूर्ण निरोप देण्यासाठी एक भव्य मिरवणूक काढण्यात आली. विद्यालयापासून सुरू झालेली ही मिरवणूक संगमेश्वर मंदिरापर्यंत मार्गस्थ झाली. या मिरवणुकीत विद्यालयाच्या 'शिवाजीयन्स' ढोल पथक, लेझीम पथक, झांज पथक आणि आकर्षक ध्वज पथकाने अतिशय



उत्साहपूर्ण व शिस्तबद्ध सादरीकरण करत रस्त्यावरील सर्वांची मने जिंकली. ढोल-ताशांचा गजर, लेझीमचे जोशपूर्ण तालबद्ध सादरीकरण आणि ध्वज प्रात्यक्षिकांमुळे संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता. मिरवणुकीची सांगता ऐतिहासिक संगमेश्वर मंदिर येथे उत्साहात झाली. याठिकाणी बाप्पाची विधिवत आरती करण्यात आली आणि त्यानंतर संपूर्ण पर्यावरणपूरक पद्धतीने श्री गणेशमूर्तीचे विसर्जन करण्यात आले. डोळ्यांत पाणी आणि ओठांवर श्रद्धा ठेवत साऱ्यांनी लाडक्या बाप्पाला निरोप दिला. विद्यार्थ्यांनी केलेल्या या उत्कृष्ट आणि अनुशासनबद्ध सादरीकरणाबद्दल संस्थेचे रविंद्रपंत जगताप, कानिफनाथ आमराळे, विद्यालयाचे प्राचार्य डॉ. अभिजीत टकले, अनिल पाटील, उपप्राचार्य सुषमा रासकर तसेच गुरुकुलचे मुख्याध्यापक विजयकुमार हाके, मुख्याध्यापिका प्रिया गायकवाड यांसह दीपक जगताप, अमोल सावंत, सुजीत कांबळे, अनिल मोरे, गणेश भैरवकर आणि संस्थेच्या सर्व अधिकारी व पदाधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांचे भरभरून कौतुक केले.

## थोडक्यात पण महत्वाचे



### वाल्हेत कर्मवीर भाऊराव पाटील जयंती उत्साहात

**वाल्हे: दैनिक संध्या**

वाल्हे ( ता. पुरंदर) येथील रयत शिक्षण संस्थेच्या महर्षी वाल्मीकी विद्यालयाने पद्मभुषण डॉ.कर्मवीर भाऊराव पाटील यांची १३९ वी जयंती मोठ्या उत्साहात आणि वैभवशाली परंपरेत साजरी केली. यावेळी कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या प्रतिमेचे पुजन वाल्हे गावचे सरपंच अतुल गायकवाड स्कुल कमिटीचे सदस्य उमेश शहा माजी सभापती गिरीश पवार तसेच विद्यालयाचे प्राचार्य नाजमीन आतार यांच्या हस्ते करण्यात आले. या दरम्यान आकर्षक रंगबेरंगी पताकांनी सजविलेल्या ट्रॅक्टरमध्ये डॉ. भाऊराव पाटील यांच्या प्रतिमेची गावातून भव्य मिरवणुक काढण्यात आली.यावेळी विद्यालयाच्या टिपरी व लेझीम पथकाने मिरवणुकीची शोभा वाढवली.अशातच मिरवणुक कुमठेकर चौकात आल्यानंतर मुलींच्या टिपरी पथकाने विविध खेळ सादर करून त्याद्वारे बेटी बचाओ, बेटी पढाओ चा संदेश देऊन उपस्थितांची मने जिंकली. या प्रसंगी विद्यालयाचे टेक्निकल विभाग प्रमुख संतोष जगदाळे शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष किशोर कुदळे तसेच सतीश पवार आरपीआय चे शाखा अध्यक्ष शैलेंद्र भोसले यांसह शिक्षक सेवक आदी मान्यवर उपस्थित होते.



### फेसकॉमने घेतली उपमुख्यमंत्री पवार यांची भेट

**मुंबई : दैनिक संध्या**

महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक महासंघ (फेसकॉम ) मुंबईचे अध्यक्ष सुरेश पोटे यांनी उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांची राष्ट्रवादी कार्यालय, मुंबई येथे मंगळवारी दि.२२ सप्टेंबर २०२६ रोजी सदिच्छा भेट घेतली. या भेटी दरम्यान ज्येष्ठ नागरिकांच्या विविध समस्या व प्रलंबित मागण्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. यामध्ये प्रामुख्याने रेल्वे प्रवासातील ज्येष्ठ नागरिकांची सवलत (कन्सेशन) पूर्ववत सुरू करण्याबाबत सविस्तर चर्चा झाली. यावेळी सुनेत्रा पवार यांनी सर्व मागण्या गांभीर्याने समजून घेतल्या व रेल्वे कन्सेशनचा प्रश्न संसदेत व संबंधित मंत्रालयाकडे लावून धरून पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले. या प्रसंगी फेस्कॉम मुंबई अध्यक्ष सुरेश पोटे, उपाध्यक्षा डॉ. रेखा भातखंडे, सदस्य संजय साने आणि सदस्य उज्ज्वल पाठारे उपस्थित होते.

### महावितरणच्या विविध सेवा, सौर योजनांचा लाभ एकाच छताखाली उपलब्ध

**मुंबई : दैनिक संध्या**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या सार्वजनिक व घटनात्मक पदावरील कार्यकाळास २५ वर्षे पूर्ण होत असल्याच्या औचित्याने वीजग्राहकांना अधिक वेगवान आणि सुलभ सेवा देण्यासाठी प्रत्येक तालुक्यात महावितरणकडून विशेष सेवा कक्ष उभारून येत्या १७ ऑक्टोबर २०२६ पर्यंत 'सेवा सेतू' आणि 'सेवा संकल्प अभियान' राबविण्यात येत आहे. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव तथा महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांच्या नेतृत्वात महावितरणकडून या दोन्ही अभियानाला गुरुवार (दि. १७ सप्टेंबर) पासून प्रारंभ झाला. संचालक श्री. धनंजय औंढेकर (संचालन) व श्री. राजेंद्र पवार (मानव संसाधन) यांनी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे अभियानाच्या अंमलबजावणीचा मंगळवारी (दि. २२) आढावा घेतला व हे अभियान आणखी गतीमान करण्याची सूचना केली. यावेळी कार्यकारी संचालक (मानव संसाधन) श्री. परेश भागवत यांनी अभियानाची सविस्तर माहिती दिली. या बैठकीला कार्यकारी संचालक श्री. भुजंग खंदारे, श्री. अंकुर कावळे, श्री. सुनील काकडे, श्री. संदीप पाटील, श्री. चंद्रमणी मिश्रा यांच्यासह राज्यातील मुख्य अभियंते व अधीक्षक अभियंते उपस्थित होते.




### जागर व्यसनमुक्तीचा अभियानात गोरे विद्यालयाचा डंका

**चाकण : दैनिक संध्या**

पिंपरी - चिंचवड आयुक्तालयाच्या वतीने राबविण्यात आलेल्या 'जागर व्यसनमुक्तीचा' तसेच अंमली पदार्थ विरोधी जनजागृती मोहिमेअंतर्गत रील स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत चाकण येथील सुरेशभाऊ गोरे विद्यालयाने बाजी मारली. तसेच सहभागी झालेल्या शाळांचा व विद्यार्थ्यांचा उत्तर चाकण पोलीस ठाण्याच्या वतीने सन्मान करण्यात आला. या स्पर्धेत स्व. आमदार सुरेशभाऊ गोरे माध्यमिक विद्यालय व ज्युनियर कॉलेजने प्रथम क्रमांक पटकावला. या रीलमध्ये विद्यार्थी जितेंद्र पवार, संचित काळुगुडे, विराज वाळके, पार्थ कछवा, शुभम हिवराळे, श्रवण गुंजाळ व विश्वजीत खासीमपुरे यांनी भूमिका साकारल्या. त्यांना शिक्षक सिद्धार्थ मळेवडी, दत्तात्रय लिंभोरे व सचिन आभाळे यांनी मार्गदर्शन केले. द्वितीय क्रमांक ज्ञानवर्धिनी विद्यालयाने मिळविला. यामध्ये स्वरा रांधवन, रेवती पवार, तनिष्का दिघे, श्रेया टेकाळे, वीर बोऱ्हाडे व शुभम हिवराळे यांनी भूमिका साकारल्या. त्यांना सुनिल वडेकर, सविता कुमकर व मुख्याध्यापिका प्रमिला गोरे यांनी मार्गदर्शन केले. तसेच तृतीय क्रमांकही ज्ञानवर्धिनी विद्यालयाने पटकावला. या रीलमध्ये तनिष्का दिघे, शुभम हिवराळे, स्वरा रांधवन, वीर बोऱ्हाडे, रेवती पवार, मेघराज शेवकरी, आराध्या हेगडे, तसेच डॉक्टरची भूमिका साकारणाऱ्या निकिता गोरे यांनी सहभाग घेतला. त्यांना सविता कुमकर, अर्चना माळी, उर्मिला कोबल, लिना चौधरी, सागर पवार व मुख्याध्यापिका प्रमिला गोरे यांनी मार्गदर्शन केले.

# इलेक्ट्रिक वाहन क्षेत्रातील नवकल्पनांना गती

## 'एआयसी पिनॅकल' व 'नॅट्रॅक्स' यांच्यात सामंजस्य करार

■ पुणे : (दै. संध्या)

इलेक्ट्रिक वाहने, ऑटोमोटिव्ह तंत्रज्ञान आणि कनेक्टेड मोबिलिटी क्षेत्रातील नवकल्पना व स्टार्टअपला गती देण्यासाठी एआयसी पिनॅकल एंटरप्रेन्युअरशिप फोरम आणि नॅशनल ऑटोमोटिव्ह टेस्ट ट्रॅक्स (नॅट्रॅक्स) यांच्यात सामंजस्य करारावर १६ सप्टेंबर २०२६ रोजी स्वाक्षरी करण्यात आली. स्टार्टअप इनक्युबेशन, तांत्रिक मार्गदर्शन, चाचणी व प्रमाणीकरण सुविधा तसेच उद्योग क्षेत्राशी संपर्क उपलब्ध करून देणे, हा या कराराचा प्रमुख उद्देश आहे. स्टार्टअपसाठी ऑटोमोटिव्ह चाचणी सुविधा आणि उद्योग क्षेत्राशी संपर्क यांच्यातील सहकार्य अधिक मजबूत होऊन पुढील पिढीतील मोबिलिटी तंत्रज्ञानाच्या विकासाला चालना मिळणार आहे.




चाकण येथील 'पिनॅकल मोबिलिटी सोल्युशन्स-इका'च्या प्रकल्पात एआयसी पिनॅकलचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. अविनाश ठाकूर आणि 'नॅट्रॅक्स'चे संचालक डॉ. मनीष जैस्वाल यांनी सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या केल्या. यावेळी 'इका-पिनॅकल मोबिलिटी सोल्युशन्स'चे मुख्य उत्पादन अधिकारी झोएब अल्ताफहुसेन करमपूरवाला, संशोधन व विकास विभागाचे मुख्य अभियंते, कौस्तुभ जोशी व पंकज मुनोळी, स्वप्नील तांबे उपस्थित होते. 'एआयसी पिनॅकल'तर्फे वरिष्ठ व्यवस्थापक शादाब हुसेन, तर 'नॅट्रॅक्स'तर्फे वरिष्ठ अभियंता व समूह प्रमुख तुलिका मजुमदार उपस्थित होत्या.

'एआयसी पिनॅकल'कडे स्टार्टअप इनक्युबेशन, मार्गदर्शन आणि उद्योगांशी संपर्काचे व्यापक जाळे आहे, तर 'नॅट्रॅक्स'कडे अत्याधुनिक वाहन चाचणी व प्रमाणीकरणाची सुविधा आहे. या भागीदारीअंतर्गत स्टार्टअप इनक्युबेशन, कौशल्यविकास कार्यक्रम, हॅकाथॉन, नवकल्पना स्पर्धा, तांत्रिक सत्रे, मार्गदर्शन कार्यक्रम आणि उद्योगांशी संवाद अशा विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. विशेषतः इलेक्ट्रिक वाहने आणि ऑटोमोटिव्ह मोबिलिटी क्षेत्रातील स्टार्टअपना तांत्रिक तज्ज्ञ, उद्योगांचे नेटवर्क आणि चाचणी सुविधांचा लाभ मिळवून देण्यावर भर राहणार आहे.

डॉ. अविनाश ठाकूर म्हणाले, 'नॅट्रॅक्स' सोबतची भागीदारी स्टार्टअप आणि ऑटोमोटिव्ह चाचणी व प्रमाणीकरण क्षेत्रामधील महत्त्वाचा दुवा ठरेल. इनक्युबेशनच्या पलीकडे जाऊन नवकल्पनांना तांत्रिक, औद्योगिक आणि चाचणीविषयक मदत मिळवून देत बाजारपेठेसाठी तयार उत्पादने विकसित करण्यास प्रोत्साहन देणे, हा आमचा उद्देश आहे. इलेक्ट्रिक आणि कनेक्टेड मोबिलिटी क्षेत्रात या सहकार्यामुळे अनेक उपयुक्त उपक्रम राबविता येतील. स्टार्टअपना उद्योग, धोरणात्मक भागीदार, शैक्षणिक संस्था, सरकारी यंत्रणा आणि इतर संबंधित संस्थांशी जोडण्याचाही प्रयत्न केला जाणार आहे. महाराष्ट्रासह मध्यप्रदेश आणि देशातील ऑटोमोटिव्ह नवकल्पना परिसंस्थेशी स्टार्टअपचे संबंध अधिक दृढ करण्यावर भर दिला जाणार आहे. डॉ. मनीष जैस्वाल म्हणाले, "नवकल्पनांना पाठबळ देणे आणि ऑटोमोटिव्ह तंत्रज्ञानाची परिसंस्था अधिक सक्षम करणे, यासाठी नॅट्रॅक्स कटिबद्ध आहे. एआयसी पिनॅकलसोबतच्या सहकार्यामुळे स्टार्टअप आणि नवोन्मेषकांना चाचणी, प्रमाणीकरण आणि तांत्रिक सुविधांचा लाभ मिळेल. अशा भागीदारीमुळे भविष्यातील मोबिलिटी तंत्रज्ञानाच्या विकासाला आणि स्वीकाराला गती मिळू शकते."

> "
> एआयसी पिनॅकल एंटरप्रेन्युअरशिप फोरम ही अटल इनोव्हेशन मिशन, नीती आयोगाच्या सहकार्याने कार्यरत ना-नफा तत्त्वावरील स्टार्टअप इनक्युबेटर संस्था आहे. इलेक्ट्रिक वाहने, पर्यावरण व शाश्वतता, क्लीनटेक, हेल्थटेक, उत्पादन व अभियांत्रिकी यांसह विविध उदयोन्मुख क्षेत्रांतील स्टार्टअपना इनक्युबेशन, मार्गदर्शन, उद्योगांशी संपर्क आणि कौशल्यविकासाच्या माध्यमातून सहकार्य केले जाते. येत्या काळात इलेक्ट्रिक वाहनांना प्राधान्य दिले जाईल. इलेक्ट्रिक मोबिलिटी विकसित होण्यासाठी हा सामंजस्य करार उपयुक्त ठरेल."
>
> - डॉ. सुधीर मेहता, पिनॅकल ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष

# आई-वडिलांच्या कष्टांना यशाची किनार

## पूजा ताकवणे महसूल सहाय्यकपदी



■ दौंड: (दै. संध्या)

दौंड तालुक्यातील पारगाव येथील पूजा सोमनाथ ताकवणे हिने प्रतिकूल आर्थिक परिस्थितीवर मात करत मेहनत व जिद्दीच्या जोरावर महसूल सहाय्यक पदावर निवड मिळवली आहे. ग्रामीण भागातील सामान्य कुटुंबातील मुलीने मिळविलेल्या या यशाचे परिसरातून कौतुक होत आहे.

पूजाचे आई-वडील शेतीवर अवलंबून असून त्यांच्या कुटुंबाकडे केवळ एक एकर शेतजमीन आहे. आर्थिक परिस्थिती मर्यादित असतानाही पूजाने आपल्या ध्येयापासून विचलित न होता अभ्यास सुरू ठेवला.

आई-वडिलांनी केलेला संघर्ष आणि त्यांचे कष्ट पाहून आयुष्यात स्वतःच्या पायावर उभे राहण्याची प्रेरणा मिळाल्याचे पूजाने सांगितले. "आई-वडिलांचे कष्ट मी जवळून पाहिले आहेत.

आयुष्यात काहीतरी बनायचे, या उद्देशाने सातत्याने प्रयत्न करत राहिले. अनेक अडचणी आल्या; मात्र प्रयत्न सोडले नाहीत. अखेर मेहनतीचे चीज झाले. आता महसूल विभागात काम करताना सर्वसामान्य नागरिकांना त्यांच्या अडचणींमध्ये योग्य मार्गदर्शन व न्याय मिळवून देण्यासाठी प्रामाणिकपणे काम करणार आहे," अशी भावना पूजा ताकवणे हिने व्यक्त केली.

पूजाच्या या उल्लेखनीय यशाबद्दल तिचा गौरव करण्यासाठी ज्येष्ठ नागरिक सेवा संघ, केडगावचे पद्माकर देशमुख यांनी केडगाव येथील कार्यालयात तिचे अभिनंदन व सत्कार केला. यावेळी सुदाम हंडाळ, धना जी हाके, दादा हंडाळ, राजेंद्र टेंगले, रवींद्र जाधव, सोमनाथ ताकवणे यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते. ग्रामीण व आर्थिकदृष्ट्या सामान्य परिस्थितीतून आलेल्या पूजाने मिळविलेले यश हे मेहनत, चिकाटी आणि ध्येय निश्चितीचे उदाहरण ठरले आहे.

# डायबेटिक फूट अँड वाऊंड केअर क्लिनिकचा शुभारंभ



■ पुणे(दै. संध्या)

पुण्यातील आदित्य बिर्ला मेमोरिअल हॉस्पिटलने (एबीएमएच) आपल्या डायबेटिक फूट अँड वाऊंड केअर क्लिनिकचा शुभारंभ केला आहे. हे विशेष केंद्र डायबेटिक फूटच्या गुंतागुंतींची आणि जुनाट जखमांची वेळेत ओळख पटवून त्यावर उपचार करण्यावर लक्ष केंद्रित करेल. हे क्लिनिक वेळेवर तपासणी, जखमांवर आधुनिक पद्धतीने देखभाल (अॅडव्हान्स्ड वाऊंड केअर), हात-पाय कापले जाण्यापासून वाचवण्यासाठी आवश्यक वैद्यकीय हस्तक्षेप (लिंब सॅल्व्हेज) आणि पुनर्वसन साहाय्य सेवा प्रदान करण्यासाठी तज्ज्ञ डॉक्टरांच्या टीमला एकाच छताखाली एकत्र आणते.

या शुभारंभप्रसंगी आदित्य बिर्ला मेमोरिअल हॉस्पिटलचे सीईओ श्री. पामेश गुप्ता यांच्यासह मिनिमली इन्व्हेसिव्ह अँड लॅपरोस्कोपिक सर्जरीचे सीनियर कन्सल्टंट डॉ. मनिष श्रीवास्तव आणि असोसिएट कन्सल्टंट (जनरल सर्जरी, लॅपरोस्कोपिक सर्जरी अँड प्रोक्टॉलॉजी) डॉ. कुमार रौशन उपस्थित होते. हे दोघे या क्लिनिकचे नेतृत्व करत असून संपूर्ण वैद्यकीय उपचार पद्धतीवर देखरेख ठेवतील. यांच्यासोबत डॉ. विक्रम वाघ, डॉ. रितेश काकरानिया, डॉ. कैलास जरुले आणि डॉ. हर्षवर्धन ओक या डॉक्टरांचीही प्रमुख उपस्थिती होती. तसेच परिसरातील जवळपास १५० नागरिक व रहिवासी या उद्घाटन सोहळ्याला उपस्थित होते. या शुभारंभाबाबत मत व्यक्त करत आदित्य बिर्ला मेमोरिअल हॉस्पिटलच्या मिनिमली इन्व्हेसिव्ह अँड लॅपरोस्कोपिक सर्जरीचे सीनियर कन्सल्टंट डॉ. मनिष श्रीवास्तव म्हणाले, "मधुमेहामुळे मज्जातंतूंचे होणारे नुकसान यामुळे डायबेटिक फूटच्या गुंतागुंती अनेकदा कोणतीही विशेष वेदना न होता वाढू शकतात


( Photo : Sushil Rathod )

## महाराणा प्रताप मित्र मंडळाचा रौप्य महोत्सवी सेवा यज्ञ

■ पुणे : (दै. संध्या)

रविवार पेठेतील महाराणा प्रताप मित्र मंडळ रौप्य महोत्सव साजरा करत असताना यंदाच्या वर्षी बाप्पांच्या चरणी बालसाहित्य अर्पण करण्यात आले व विविध सामाजिक उपक्रमांनी साजरा होत आहे. समाजाशी असलेली नाळ अधिक घट्ट करताना गेली २५ वर्ष अनेक समाज उपयोगी सेवा कार्य उपक्रम राबवत आहे.

यांकडच्या वर्षी , १०८९/९०, रविवार पेठ, पुणे-२ यंदा आपल्या स्थापनेची २५ वर्षे पूर्ण करत रौप्य महोत्सवी वर्ष साजरे करत आहे. गेल्या पंचवीस वर्षांच्या प्रवासात उत्सवाची परंपरा जपत समाजाशी असलेली नाळ अधिक घट्ट करण्याचा प्रयत्न मंडळाने केला आहे.गणेशोत्सव म्हणजे केवळ सजावट, रोषणाई आणि उत्सव नव्हे, तर समाजासाठी काहीतरी देण्याची संधी, ही भूमिका मनाशी ठेवून मंडळाने रौप्य महोत्सवी वर्षात विविध समाजोपयोगी उपक्रमांचे आयोजन केले आहे. रक्तदान शिबिर घेऊन गरजू रुग्णांसाठी रक्तसाठा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करण्यात आला. विविध ठिकाणी अन्नदान करून गरजूंपर्यंत मायेचा घास पोहोचवण्यात आला. लहान मुलांसाठी अनेक स्पर्धा घेणे, सफाई कर्मचाऱ्यांचा सन्मान, शेतकरी बांधवांना विविध मदत कार्य मंडळा कडून होत असते. "ज्ञान हेच खरे धन " या भावनेतून " पुस्तकांचा नैवेद्य " हा अभिनव उपक्रम राबवून पुस्तके संकलित करण्यात आली.

# विद्यार्थ्यांच्या कला गुणांना वाव देण्याची गरज : पौर्णिमा मोहिते

■ चाकण (दै. संध्या)




पालकांनी मुलांचे कलागुण, कौशल्य ओळखून त्यांच्या कला गुणांना वाव द्यावा. अभ्यासासोबत इतर क्षेत्रातही विद्यार्थ्यांना प्रोत्साहन द्यावे, असे प्रतिपादन ग्लोबल फाउंडेशन डी. डी. मोहिते इंग्लिश मीडियम स्कूलच्या प्राचार्या पौर्णिमा मोहिते यांनी केले. चाकण येथील सारा अबॅकस अकॅडमी आणि संतोष ऑल राऊंडर अकॅडमी येथे आंतरराष्ट्रीय अबॅकस गणित महामंडळ तैवान आणि भारत यांच्या संयुक्त विद्यमाने अबॅकसच्या ७९ आंतरराष्ट्रीय मूल्यांकन परीक्षेचे आयोजन केले होते. या परीक्षेमध्ये चाकण येथून ४२ विद्यार्थी सहभागी झाले होते. यापैकी ४० विद्यार्थी उत्तीर्ण झाले. या गुणवंत विद्यार्थ्यांचा पारितोषिक वितरण समारंभ व अठराव्या कौतुक सोहळ्यात मार्गदर्शन करताना पौर्णिमा मोहिते बोलत होत्या. मोहिते म्हणाल्या,"अबॅकसचे कठीण आणि क्लिष्ट सर्व प्रकारचे गणिताचे उदाहरण विद्यार्थ्यांनी वयोगटांनुसार ३ मिनिटांमध्ये ५० उदाहरणं सोडवून शंभर टक्के गुण मिळवून यश संपादित केले, ही एक कौतुकास्पद बाब आहे. संध्या जाधव, कविता बोडके, पल्लवी पवार, स्वाती ढबाले, सविता गायकवाड, स्वाती ढवळे व डॉ. संतोष प्रवीण आघाव या शिक्षकांचा त्यांनी गौरव केला.

# दुष्काळग्रस्त विद्यार्थ्यांचे दहावी-बारावीचे शुल्क माफ करा

■ पुणे (दै. संध्या)



राज्यातील दुष्काळी व नैसर्गिक संकटग्रस्त परिस्थितीचा फटका बसलेल्या कुटुंबांतील दहावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क सरसकट माफ करण्यात यावे तसेच ज्या विद्यार्थ्यांनी यापूर्वीच परीक्षा शुल्क भरले आहे, त्यांचे शुल्क परत करण्यात यावे, अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचे अध्यक्ष शिवराज मोरे यांनी केली आहे.

या मागणीसंदर्भात मंडळाच्या सचिव मीनाक्षी राऊत यांची भेट घेऊन निवेदन देण्यात आले. राज्यातील अनेक कुटुंबांना सध्याच्या परिस्थितीचा आर्थिक फटका बसला असून त्याचा परिणाम विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर होऊ नये, यासाठी परीक्षा शुल्कमाफीचा निर्णय तातडीने घेण्याची मागणी शिष्टमंडळाने केली.

यावेळी विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्काबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. या विषयावर राज्य परीक्षा मंडळाशी चर्चा करून योग्य निर्णय घेण्याच्या दृष्टीने विचार करण्यात येईल, असे शिष्टमंडळाला सांगण्यात आले. विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर आर्थिक संकटाचा परिणाम होऊ देणार नाही – शिवराज मोरे यावेळी शिवराज मोरे म्हणाले, "राज्यात जेव्हा-जेव्हा दुष्काळ किंवा गंभीर नैसर्गिक संकटाची परिस्थिती निर्माण झाली, तेव्हा विद्यार्थ्यांना दिलासा देण्यासाठी शासनाने विविध निर्णय घेतले आहेत.

## थोडक्यात पण महत्वाचे



### रस्ते वाहतूक सुरक्षा सप्ताहानिमित्त पुरोगामी विद्यालयात निबंध स्पर्धा संपन्न

**हवेली: दैनिक संध्या**

लोणी काळभोर वाहतूक विभाग पुणे शहर यांच्या वतीने रस्ते वाहतूक सुरक्षा व विद्यार्थी सुरक्षा या उपक्रमांतर्गत पुरोगामी माध्यमिक विद्यालय नायगाव ता . हवेली येथे नुकतीच निबंध स्पर्धा घेण्यात आली या स्पर्धेचे बक्षीस वितरण आज दिनांक 22 /9/ 2026 रोजी संपन्न झाला या कार्यक्रमासाठी लोणी काळभोर वाहतूक विभागाचे सहाय्यक पोलीस निरीक्षक जोरे साहेब पोलीस हवालदार श्री ढाकणे , श्री टेंगले, सौ इनामदार इत्यादी मान्यवर उपस्थित होते. या निबंध स्पर्धेसाठी रस्ता सुरक्षा आपली सामूहिक जबाबदारी, हेल्मेट माझा सुरक्षा साथीदार, आजची वाहतूक शिस्त उद्याचे सुरक्षित जीवन, मी वाहतुकीचे नियम पाळणार, वाहतुकीचे नियम पाळू अपघात टाळू या विषयांवर निबंध स्पर्धा घेण्यात आली या स्पर्धेत शेंडगे संतोषी बालाजी प्रथम क्रमांक, मोठे दीक्षा बाबुराव द्वितीय क्रमांक, कांबळे निवेदिता निलेश तृतीय क्रमांक तर उत्कृष्ट लेखनाबद्दल उत्तेजनार्थ म्हणून आढाव योगेश्वरी गणेश, साद सादिक शेख, काकडे वैष्णवी दिलीप या विद्यार्थ्यांना पारितोषिके देण्यात आले. स्पर्धेचे उत्कृष्ट नियोजन केल्याबद्दल विद्यालयातील सहशिक्षिका सौ वंदना चौधरी, श्रीमती सविता देवकर यांना प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले. याप्रसंगी श्री जोरे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना आपले जीवन अनमोल आहे ते आपल्याला जास्त काळ लाभावे वाटत असेल तर रस्ते सुरक्षा आणि रस्ता पार करत असतानाची घ्यायची काळजी या गोष्टी जपल्या पाहिजेत तसेच आपले कुटुंब सुरक्षित राहण्यासाठी दुचाकी चालवताना हेल्मेट वापरणे, चार चाकी चालवताना सीट बेल्ट वापरणे पायी चालताना पादचारी मार्गाचा वापर करावा,या गोष्टी वडिलधाऱ्यांना सांगाव्यात असे सांगितले या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दिलीप थोपटे यांनी केले तर आभार विद्यालयाचे मुख्याध्यापक प्रवीण गायकवाड यांनी मानले कार्यक्रमाचे नियोजन सांस्कृतिक विभाग प्रमुख सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी केले.




### चाकणला बालविवाह प्रतिबंधक अभियान फेरीला प्रचंड प्रतिसाद

**चाकण : दैनिक संध्या**

बेटी बचाव बेटी पढाव, बालविवाहाला नकार, मुलींचे शिक्षण सुरू ठेवा आदी नावांचे नामफलक हातात घेऊन मंथन फाउंडेशनच्या वतीने चाकण येथे आयोजित करण्यात आलेल्या बालविवाह प्रतिबंधक अभियान फेरीला सर्व स्तरातून प्रचंड प्रतिसाद मिळाला. स्त्रीभ्रूणहत्या थांबली पाहिजे, कळी कोमेजण्या आधीच चिमुकल्यांचे बळी रोखले पाहिजेत, महिलांवर अन्याय झाला नाही पाहिजे, यासाठी मंथन फाउंडेशन चाकण पंचक्रोशीत जनजागृती करत आहे. येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा व उर्दू माध्यम शाळेतील विद्यार्थिनींच्या सहभागातून चाकण परिसरात बालविवाह प्रतिबंधक अभियान फेरी काढण्यात आली होती. बालविवाह ही सामाजिक आणि गंभीर समस्या असून त्याचे दुष्परिणाम समाजापर्यंत पोहोचविणे आणि बालविवाह रोखण्यासाठी जनजागृती करणे हा या फेरीचा मुख्य उद्देश असल्याचे मंथन फाउंडेशनच्या संचालिका ज्योती गायकवाड यांनी सांगितले. विद्यार्थिनींनी हातात जनजागृतीपर नामफलक घेऊन शहरातून काढलेल्या या अभियान फेरीचे नगराध्यक्षा मनिषा गोरे, उपनगराध्यक्षा जयश्री नायकवाडी, महिला व बालकल्याण समितीच्या सभापती रुपाली कांडगे, नगरसेविका सुवर्णा राक्षे, रेशमा मुटके व नगरसेवक मंगेश कांडगे तसेच चाकण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र कदम आदींनी जोरदार स्वागत केले. ज्योती गायकवाड व राजश्री चौगुले यांनी सांगितले की," अशिक्षितपणामुळे ग्रामीण भागात होत असलेले बालविवाह थांबले पाहिजेत. शिकलेली आई घराघराला पुढे नेई, हे ब्रीद सत्यात उतरविण्याची गरज आहे. मुलींचे शिक्षण सुरू ठेवले पाहिजे. बाल विवाहाला पायबंद घातला पाहिजे." याप्रसंगी येथील उर्दू शाळेच्या मुख्याध्यापिका यास्मिन मोहम्मद इजहरोद्दीन, मराठी शाळेचे मुख्याध्यापक राम गाडगे, नुपूर निकम आदींसह विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित मान्यवर, ग्रामस्थ, शिक्षक, शिक्षिका, पालक, सेवक वृंद मोठ्या संख्येने उपस्थित होते. " बाल विवाहामुळे मुलींच्या शिक्षणावर, आरोग्यावर व भवितव्यावर विपरीत परिणाम होण्याचा संभव असतो. बालविवाहमुक्त समाज निर्माण करण्यासाठी सर्वांनी एकत्रित प्रयत्न केले पाहिजेत.असे ज्योती गायकवाड, संचालिका, मंथन फाउंडेशन यांनी सांगितले.



### पुरंदर तालुक्यातील रिसेपिसे येथे वीज पडून सहा शेळ्या मेंढ्यांचा मृत्यू

**जेजुरी : दैनिक संध्या**

दिनांक 22 पुरंदर तालुक्यातील रिसेपिसे परिसरात 22-रोजी सांयकाळी 5 ते 5.15 दरम्यान हलक्या स्वरूपात पाऊस चालु असताना अचानक जोरदार विज कडाडली. ही वीज मोहन मुळीक यांच्या शेतात मेंढपाळ म्हातारो सोनबा ठोंबरे हे बकरी चारत असताना त्यावर येवुन पडली या घटनेत त्यांच्या सहा शेळ्या व मेंढ्याचा मृत्यू झाला. यावेळी मेंढपाळ थोडक्यात बचावला. या दुष्काळात त्यांच्यावर ओढवलेली ही परिस्थिती नुकसानकारक असून शासनाने दखल घेऊन सदर मेंढपाळास नुकसान भरपाई मिळावी अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.





# विद्यार्थिनींच्या कलाविष्काराने कर्मवीर जयंती उत्साहात

**'मिनी भारत' अवतरला; विविध राज्यांच्या पारंपरिक वेशभूषेतील विद्यार्थिनींचा सहभाग; पथनाट्य, लाठीकाठी व रिंग प्रात्यक्षिकांनी वेधले ग्रामस्थांचे लक्ष**

■ नीरा (दै. संध्या)

शिक्षण हे केवळ पुस्तकी ज्ञान न राहता विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासाचे प्रभावी माध्यम ठरावे, या उद्देशाने रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक कर्मवीर भाऊराव पाटील यांची जयंती नीरा येथील रयत संकुलात विविध सांस्कृतिक व शैक्षणिक उपक्रमांनी उत्साहात साजरी करण्यात आली. यानिमित्त काढण्यात आलेल्या भव्य मिरवणुकीत विविध राज्यांच्या पारंपरिक वेशभूषेतील विद्यार्थिनी सहभागी झाल्याने 'नीरा गावात जणू मिनी भारत अवतरला', असे विलोभनीय चित्र पाहायला मिळाले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी कर्मवीर भाऊराव पाटील व लक्ष्मीबाई यांच्या प्रतिमेचे पूजन स्कूल कमिटीचे सदस्य लक्ष्मण चव्हाण, रेणुका कोठडिया, रेखा चव्हाण, तनुजा शहा, संतोष गांधी, आदेश गिरमे, शांतीकुमार कोठडिया, सुदर्शन जैन, महात्मा गांधी विद्यालयाचे प्राचार्य अनिल धुमाळ व नीरा कन्या विद्यालयाच्या मुख्याध्यापिका निर्मला माने यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मान्यवर, शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

सौ. लिलावती रिखवलाल शहा कन्या विद्यालयात नव्याने उभारण्यात आलेल्या 'कर्मवीर स्मृती स्थळा'चे उद्‌घाटन मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या शैक्षणिक कार्याचा, संघर्षाचा व त्यागाचा परिचय विद्यार्थिनींना व्हावा आणि त्यांच्या विचारांची प्रेरणा मिळावी, या उद्देशाने या स्मृती स्थळाची निर्मिती करण्यात आली आहे.

यानंतर रयत संकुलाच्या वतीने नीरा गावातून भव्य मिरवणूक काढण्यात आली. पंजाब, राजस्थान, दक्षिण भारत, बंगाल, महाराष्ट्र, आसाम, मिझोराम आदी विविध राज्यांच्या संस्कृतीचे दर्शन घडविणाऱ्या पारंपरिक वेशभूषेत विद्यार्थिनी सहभागी झाल्या होत्या. धनगर वेशभूषा, वारकरी संप्रदाय तसेच पारंपरिक पालखीने मिरवणुकीची शोभा वाढवली. विविधतेतून एकतेचा संदेश देणाऱ्या या उपक्रमाला ग्रामस्थांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

मिरवणूक ग्रामपंचायत चौकात आल्यानंतर विद्यार्थिनींनी 'रयतेचा राजा : कर्मवीर' या पथनाट्याचे प्रभावी सादरीकरण केले. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या बालपणापासूनच्या संघर्षमय जीवनप्रवासातील विविध प्रसंग विद्यार्थिनींनी अभिनयातून साकारले. यामुळे उपस्थित ग्रामस्थांना कर्मवीर अण्णांच्या कार्याची आणि त्यागाची पुन्हा एकदा जाणीव झाली.

यावेळी विद्यार्थिनींनी रिंग फिरविण्याचे आकर्षक प्रात्यक्षिक तसेच लाठीकाठीचे शौर्यपूर्ण सादरीकरण करून उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. या प्रात्यक्षिकांतून विद्यार्थिनींच्या कलागुणांसोबतच शारीरिक कौशल्य, आत्मविश्वास, शिस्त, संघभावना आणि सादरीकरण क्षमतेचे दर्शन घडले.

मिरवणुकीदरम्यान गावातील विविध ठिकाणी कर्मवीर अण्णांच्या रथाचे व प्रतिमेचे पूजन करण्यात आले. नीरेचे उपसरपंच राजेश काकडे, अनिल चव्हाण यांच्यासह विविध मान्यवरांनी कर्मवीर भाऊराव पाटील यांना अभिवादन केले. विद्यार्थिनींचा उत्साह वाढविण्यासाठी ग्रामस्थांनी ठिकठिकाणी त्यांना पाणी, चॉकलेट व खाऊचे वाटप केले.

यावेळी मुख्याध्यापिका निर्मला माने म्हणाल्या, "कर्मवीर भाऊराव पाटील यांनी आपले संपूर्ण आयुष्य शिक्षणाच्या प्रसारासाठी वेचले. ते महाराष्ट्राचे प्रेरणादायी शिक्षणयात्री होते. विद्यार्थ्यांनी त्यांच्या विचारांची प्रेरणा घेऊन शिक्षणासोबत सामाजिक बांधिलकी, संस्कार आणि सेवाभाव जोपासणे आवश्यक आहे."

कर्मवीर जयंतीनिमित्त आयोजित या उपक्रमातून विद्यार्थिनींना भारतीय संस्कृतीची विविधता, कर्मवीर अण्णांचा संघर्षमय जीवनप्रवास आणि शिक्षणाचे सामाजिक महत्त्व यांचा प्रत्यक्ष अनुभव मिळाला. त्यामुळे हा सोहळा केवळ जयंतीचा कार्यक्रम न राहता ज्ञान, संस्कार, कला, शारीरिक कौशल्य आणि व्यक्तिमत्त्व विकासाची पर्वणी ठरला. मिरवणुकीनंतर विद्यालयात विद्यार्थिनींसाठी भोजनाचे आयोजन करण्यात आले. शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विविध घटकांच्या सहकार्याने कर्मवीर जयंती सोहळा उत्साहात व दिमाखात संपन्न झाला.

## 'हातकातरो खांब' संरक्षित स्मारके घोषित केल्याबद्दल गोवा सरकारचे अभिनंदन

■ पुणे(दै. संध्या)

गोवा सरकारने 'गोवा प्राचीन स्मारके आणि पुरातत्व स्थळे आणि अवशेष कायदा, १९७८' अंतर्गत जुने गोवे येथील ऐतिहासिक 'हातकातरो खांब' आणि फोंडा येथील 'मर्दनगड' या वास्तूंना अधिसूचना काढून संरक्षित स्थळांचा दर्जा दिला आहे. हिंदूंच्या अनेक वर्षांच्या मागणीला मिळालेल्या या यशाचे हिंदु जनजागृती समिती राष्ट्रीय स्तरावरून स्वागत करत असून या ऐतिहासिक निर्णयाबद्दल गोवा सरकारचे मनःपूर्वक अभिनंदन करत आहे, अशी माहिती समितीचे राष्ट्रीय प्रवक्ते श्री. रमेश शिंदे यांनी दिली.

जुलमी पोर्तुगीज राजवटीत आणि 'इन्क्विझिशन'च्या काळ्याकुट्ट काळात गोमंतकीय हिंदूंवर जे अनन्वित अत्याचार झाले आणि त्यांना ज्या अमानुष शिक्षा दिल्या गेल्या, त्याचे 'हातकातरो खांब' हे एकमेव जिवंत आणि प्रातिनिधिक प्रतीक आहे. धर्मासाठी प्राणांतिक यातना सहन करणाऱ्या त्या स्वाभिमानी हिंदूंच्या बलिदानाचे स्मरण भावी पिढ्यांना रहावे, यासाठी या 'हातकातरो खांबा'चे ऐतिहासिक वारसा म्हणून जतन होणे अत्यंत आवश्यक होते. यासाठी हिंदु जनजागृती समितीने गेल्या अनेक वर्षांपासून मोठा लढा उभारला. समितीने यासाठी असंख्य निवेदने दिली, आंदोलने केली, पत्रकार परिषदा घेतल्या आणि 'गोवा क्रांतीदिनी' हुतात्म्यांना श्रद्धांजली वहात या विषयाकडे सरकार व इतिहासप्रेमींचे लक्ष वेधले होते. अखेर समितीच्या आणि हिंदू



संघटनांच्या या प्रदीर्घ लढ्याला मोठे यश आले आहे.

याचबरोबर फोंडा येथील 'मर्दनगड' हा छत्रपती संभाजी महाराजांनी बांधलेला गोव्यातील एकमेव किल्ला असून तो महाराजांचे शौर्य आणि धैर्य यांचे महान प्रतीक आहे. या ऐतिहासिक ठेव्याचे संवर्धन होऊन तो भावी पिढीपर्यंत पोहोचावा यासाठी 'मर्दनगड संवर्धन समिती'ने पुढाकार घेतला होता, ज्यामध्ये हिंदु जनजागृती समितीही सक्रिय सहभागी होती. मर्दनगडाला संरक्षित स्मारक घोषित करणे, हे गोमंतकातील हिंदु संघटना आणि इतिहासप्रेमींनी उभारलेल्या मोहिमेचेच मोठे यश आहे. सरकारच्या या महत्त्वपूर्ण निर्णयानंतर आता 'हातकातरो खांब' आणि 'मर्दनगड किल्ला' यांचा खरा इतिहास दर्शवणारे माहिती फलक त्या परिसरात तात्काळ लावावेत, अशी मागणी समितीने केली आहे. तसेच या दोन्ही स्मारकांचा धगधगता इतिहास शालेय पाठ्यपुस्तकांमध्ये समाविष्ट करावा आणि गोव्यातील सर्व गड-किल्ल्यांच्या संवर्धनासाठी गोवा सरकारने तातडीने स्वतंत्र 'गड-दुर्ग संवर्धन प्राधिकरण' स्थापन करावे.



## विसर्जन मिरवणुकीआधी गणेश मंडळांना जेजुरी पोलिसांच्या सक्त सूचना

**डीजेचा आवाज, अश्लील हावभाव आणि वाहतूक अडथळ्यावर कारवाईचा इशारा**

■ जेजुरी (दै. संध्या)

शुक्रवार दिनांक 25 रोजी होणाऱ्या गणेश विसर्जन मिरवणुकीच्या पार्श्वभूमीवर जेजुरी पोलिसांनी शहरातील गणेश मंडळांची पुन्हा बैठक घेत विविध महत्त्वाच्या सूचना दिल्या. विसर्जन मिरवणुकीदरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये तसेच पुणे–पंढरपूर महामार्गावरील वाहतुकीला अडथळा निर्माण होऊ नये, यासाठी मंडळांनी विशेष खबरदारी घ्यावी अन्यथा कारवाई करण्यात येईल अशी ताकीद पोलिसांकडून देण्यात आली.

पोलीस निरीक्षक रवींद्र पाटील यांनी मंडळांच्या पदाधिकाऱ्यांना मिरवणुकीत शिस्त राखण्याचे आवाहन केले. अश्लील हावभाव, आक्षेपार्ह प्रकार तसेच अतितीव्र आवाजात डीजे वाजविल्यास संबंधितांवर कारवाई करण्यात येईल, असे स्पष्ट केले.विसर्जन मिरवणुकीदरम्यान डीजेच्या आवाजाचे रीडिंग घेण्यात येणार असून, निर्धारित मर्यादेचे उल्लंघन झाल्यास संबंधित मंडळ किंवा व्यक्तींवर गुन्हे दाखल करण्यात येतील, असा इशाराही पोलिसांनी दिला.

विसर्जन मिरवणूक शांततेत, शिस्तीत आणि कायद्याच्या चौकटीत पार पडावी तसेच पुणे–पंढरपूर मार्गावरील वाहतूक सुरळीत राहावी, यासाठी सर्व गणेश मंडळांनी पोलिस प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन सहाय्यक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर उदार यांनी केले. या बैठकीस जेजुरी पोलिस स्टेशनचे अधिकारी व जेजुरी शहरातील विविध गणेश मंडळांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सूर्यदत्ततर्फे राष्ट्रीय पुरस्कार आणि गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान सोहळा

**बन्सी-रत्न वेल्फेअर ट्रस्टतर्फे २७ सप्टेंबरला आयोजन; गुरुदेव रामनिक मुनीजी व प.पू. हिमानीजी यांचा विशेष सन्मान**

■ पुणे (दै. संध्या)



सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशन संचालित बन्सी-रत्न वेल्फेअर ट्रस्टतर्फे समाजासाठी उल्लेखनीय योगदान देणाऱ्या कर्तृत्ववान व्यक्ती आणि कुटुंबांचा गौरव करणाऱ्या वार्षिक पुरस्कारांची घोषणा करण्यात आली आहे. ट्रस्टतर्फे दरवर्षी जैन समाजातील समाजसेवा, सामाजिक विकास आणि सामुदायिक विकासासाठी उल्लेखनीय योगदान देणाऱ्या मान्यवर व्यक्ती आणि कुटुंबांचा आदर्श परिवार, आदर्श माता-पिता, समाज शिरोमणी, समाज रत्न, समाज भूषण, मानवसेवा राष्ट्रीय पुरस्कार आणि 'आयकॉन ऑफ राजस्थान' पुरस्कार अशा विविध पुरस्कारांनी गौरव करण्यात येतो.

येत्या रविवारी (ता. २७) दुपारी तीन वाजता महर्षीनगर येथील शिवशंकर सभागृहात हा सन्मान सोहळा आयोजित केला आहे. यंदा या पुरस्कारांचे दहावे वर्ष आहे. 'सूर्यदत्त'चा अत्यंत प्रतिष्ठेचा आणि मानाचा पुरस्कार गुरुदेव प. पू. रामनिक मुनीजी मा. सा. (वाणी के जादूगर) व प.पू. हिमानीजी म.सा. यांना प्रदान करण्यात येणार आहे. त्यांच्या असामान्य आध्यात्मिक प्रवासाचा, समाजासाठी दिलेल्या उल्लेखनीय योगदानाचा आणि मानवसेवेसाठी केलेल्या प्रेरणादायी कार्याचा गौरव म्हणून हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. पुरस्कारार्थींना सन्मानपत्र, स्मृतिचिन्ह आणि पारंपरिक शाल देऊन गौरविण्यात येणार आहे.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अहिंसा विश्व भारतीचे संस्थापक आचार्य डॉ. लोकेश मुनीजी असणार आहेत. प्रमुख पाहुणे म्हणून प्रसिद्ध शास्त्रज्ञ व आयसरचे सल्लागार डॉ. अरविंद नातू, विशेष अतिथी म्हणून प्रसिद्ध अभिनेते रझा मुराद तर सन्माननीय अतिथी म्हणून हिंदुस्थानी शास्त्रीय संगीत क्षेत्रातील प्रसिद्ध गायिका पद्मश्री डॉ. सोमा घोष आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या पुरस्कारांसोबतच जैन, गुजराती, माहेश्वरी आणि अग्रवाल समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचाही विशेष सत्कार करण्यात येणार आहे. इयत्ता १० वी, इयत्ता १२ वी, पदवी आणि पदव्युत्तर शिक्षणात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना यावेळी गौरविण्यात येणार आहे. पात्र विद्यार्थ्यांनी २५ सप्टेंबर २०२६ पर्यंत अर्ज करावा.

सूर्यदत्त'चे संस्थापक व अध्यक्ष प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया यांनी सांगितले की, "हा कार्यक्रम गुणवंत विद्यार्थ्यांच्या कर्तृत्वाची दखल घेण्यासोबतच त्यांना त्यांच्या करिअर आणि जीवनातील योग्य संधी व मार्गदर्शन मिळवून देण्यासाठी महत्त्वपूर्ण व्यासपीठ ठरतो. पात्र विद्यार्थ्यांनी सूर्यदत्तच्या संकेतस्थळावर उपलब्ध असलेला अर्ज भरावा आणि सत्कार समारंभाला विद्यार्थ्यांची वैयक्तिक उपस्थिती अनिवार्य आहे." शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये इयत्ता १० वी किंवा इयत्ता १२ वी उत्तीर्ण झालेले आणि ९० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळविलेले विद्यार्थी, मान्यताप्राप्त विद्यापीठातून कला, वाणिज्य किंवा विज्ञान शाखेतील पदवीमध्ये ८० टक्क्यांपेक्षा अधिक गुणांसह उत्तीर्ण केलेले विद्यार्थी, फार्मसी, अभियांत्रिकी, आर्किटेक्चर आणि तत्सम चार वर्षांचे पदवी अभ्यासक्रम ८० टक्क्यांपेक्षा अधिक गुणांसह उत्तीर्ण केलेले विद्यार्थी, पदव्युत्तर व तत्सम अभ्यासक्रम ८० टक्क्यांपेक्षा अधिक गुणांसह उत्तीर्ण केलेले विद्यार्थी. शैक्षणिक वर्ष २०२६ मध्ये पीएचडी पूर्ण केलेले विद्यार्थी, २०२६-२७ मध्ये आयआटी, आयआयएम यांसारख्या राष्ट्रीय महत्त्वाच्या संस्थांमध्ये तसेच एमबीबीएस, एमडी आणि तत्सम अभ्यासक्रम देणाऱ्या मान्यताप्राप्त संस्थांमध्ये निवड होऊन प्रवेश घेतलेले विद्यार्थी, सीए,सीएस, आयसीडब्ल्यूए आणि तत्सम परीक्षा शैक्षणिक वर्ष २०२६ मध्ये पहिल्याच प्रयत्नात उत्तीर्ण झालेले विद्यार्थी व शैक्षणिक वर्ष २०२६ मध्ये प्रतिष्ठित परदेशी विद्यापीठात प्रवेश मिळविलेले विद्यार्थी या सन्मानासाठी नोंदणी करु शकतात.